**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 441 नाग/2011**

श्री राजा खान मेहबुब खान
द्वारा डायमंड गॅस हाऊस शॉप नं.5,
छोटी मस्जीद कॉम्लेक्स सदर बाजार नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदास पेठ, नागपूर –12
2) श्री अलोणे उपव्यवस्थापक
जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदास पेठ,
नागपूर –12 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली एकुण 3 अर्ज केले होते. आणि सदरच्या तीन्ही अर्जात वेकोली आणि एस.ई.सी.एल. कोळसा कंपनीतून विट भट्टी धारकांना आणि उध्योजकांना प्रत्येक महिन्यात किती कोळशाचे वितरण करण्यात आले त्याची माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 25.1.2011 च्या पत्रानुसार तसेच दि. 24.1.2011 च्या पत्रानुसार असे कळविले की आपण माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत दाखल केलेला माहितीचा अर्ज हा नियमानुसार विहित नमुन्यात नाही म्हणून अर्ज निकाली काढण्याचे कळविले. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र याच कारणास्तव त्यांचे प्रथम अपील फेटाळल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगा समोर नमुद केले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक श्री अलोणे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने ॲड. आर. एस. सुभेदार हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्त्याने दि. 17.1.2011 रोजी माहिती मागण्यासाठी तीन अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे पाठविलेले होते. मात्र सदरचे तीन्ही अर्ज हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील तरतुदीनुसार विहित नमुन्यात नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. आणि त्याबाबत अपीलकर्त्यास दि. 25.1.2011 रोजी आणि दि. 24.1.2011 रोजी स्पष्टपणे कळविल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस ॲड. सुभेदार यांनी आयोगा पुढे आणखी असे सांगितले की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधे माहितीच्या अर्जाचा 'अ' नमुना म्हणून कायद्याने विहित केलेला आहे म्हणून त्या नमुन्यामध्येच माहिती मागणे आवश्यक आहे.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व ॲड. सुभेदार यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहितीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम 2005 तरतुदीनुसार नमुना 'अ' मध्ये करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे विहित नमुन्यात माहितीचा अर्ज करुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 तरतुदीनुसार माहिती मागण्याचा अर्ज विहित नमुन्यात सादर करावा आणि अपीलकर्ता यांचे विहित नमुन्यातील माहितीचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विहित नमुन्यात माहिती उपलब्ध करुन द्यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1955-1956

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 443 नाग/2011**

श्री अरुण विठ्ठलराव नैताम
मु. पो. पोंभूर्णा
ता. पोंभूर्णा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रशांत सत्यपाल धोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक
सहकारी संस्था तालुका पोंभूर्णा
ता. पोंभूर्णा जि. चंद्रपूर
2) श्री शरद केशरीलाल राजणे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती पोंभूर्णा
ता. पोंभूर्णा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती पोंभूर्णा ता. पोंभूर्णा जि. चंद्रपूर श्री शरद केशरीलाल राजणे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था श्री प्रशांत सत्यपाल धोटे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती पोंभूर्णा यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 10.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने या माहितीच्या अर्जात समितीच्या सन 2009–2010 चे मासीक ठरावाच्या प्रती तसेच अंकेक्षण अहवालाची प्रत आणि कर्मचारी भरती संबंधाने शासन निर्णय प्रत व हिशोब पत्रके मागितलेली होती. तथापि कृषि उत्पन्न बाजार समिती यांना माहितीचा अधिकार लागू होत नाही असा निर्णय राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती यांनी त्यांच्या कडील अपील क्र. 1441/2008 दि. 4.11.2009 मध्ये दिलेला असून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी कृषि उत्पन्न बाजार समितीला लागू होत नाही असा निर्णय दिलेला होता. म्हणून अपीलकर्त्यास दि. 6.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की कृषि उत्पन्न बाजार समितीला माहितीचा कायदा लागू होत नाही म्हणून माहिती देता येत नाही असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याचे नमुद केले.

5. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पोंभुर्णा यांचेकडे दाखल केले. मात्र सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांनी दखील अपीलकर्ता यांचे प्रथम अपील फेटाळले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

6. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पोंभुर्णा यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडील याचिका क्र. 3871/2010 मध्ये दि. 29.10.2010 रोजी मा. उच्च न्यायालयाने असा निर्णय दिलेला आहे की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी कृषि उत्पन्न बाजार समितीला लागू आहेत. म्हणून मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडील या आदेशाला अनुसरुन अपीलकर्त्यास कृषि उत्पन्न बाजार समितीने माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील दि. 10.11.2010 च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1958-1959

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार क्रमांक 509/2011

श्री राजा खान मेहबुब खान
द्वारा डायमंड गॅस हाऊस शॉप नं.5,
छोटी मस्जीद कॉम्लेक्स सदर बाजार नागपूर
ता. जि. नागपूर ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, 11, फार्मलॅड ले–आऊट
वर्धा रोड, रामदास पेठ,
नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 1.7.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 8.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 (1) अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.7.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी त्यांच्या आयोगाकडील अपील क्रमांक 340/2010 मधील निर्णय दि. 28.1.2011 नुसार त्यांना जिल्हा निहाय उद्योग घटकांना लागणा–या कोळशाची शिफारस व निर्धारण समितीने विटभट्टी धारकांना द्यावयाच्या शिफारस पत्राच्या सत्यप्रतीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्याबाबत आयोगाने आदेश दिलेले होते. त्यानुंसार जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र प्राप्त झालेल्या माहितीमध्ये सन 2009–2010 च्या कोळशाच्या वाटपाची त्यांना माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक श्री व्ही. के. अलोणे यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली आवश्यक ती माहिती कोळसा वितरणाची माहिती तक्रारदार यांना उपलब्ध करुन दिलेली आहे आणि उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये सन 2009–2010 वर्षात वितरण केलेल्या माहितीचा देखील समावेश आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

4. म्हणून प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक यांनी तक्रारदार यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये सन 2009–2010 च्या कोळसा वितरणाची माहितीचा देखील समावेश आहे असे स्पष्टपणे तक्रारदारास कळविणे योग्य होईल. म्हणून तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदारास असे कळवावे की त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये सन 2009–2010 च्या कोळसा वितरणाच्या माहितीचा देखील समावेश आहे असे स्पष्टपणे तक्रारदारास विनामुल्य कळवावे.
2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1960-1961

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 285 नाग/2011**

श्री प्रशांत अशोक सत्राळकर
ऑल सेंट हाऊस कंपाऊंड, व्हि.सी.ए.समोर
सदर नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजीत देशमुख
प्रथम अपीलीय अधिकारी
सहसंचालक(उच्च शिक्षण) कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
हिस्लॉप महाविद्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हिस्लॉप महाविद्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 1.5.2000 ते दि. 30.6.2001 या कालावधीत हिस्लॉप कॉलेजमध्ये कार्यरत असलेल्या एकुण 15 कर्मचा—यांच्या वेतन बीलाबाबत माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य हिस्लॉप महाविद्यालय नागपूर यांच्या वतीने श्री धनराज माने हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक(उच्च शिक्षण) कार्यालय नागपूर श्री अजीत देशमुख हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने श्री धनराज माने यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 6.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 6.1. 2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अपीलकर्त्यास दि. 18. 1.2011 आणि दि. 5.2.2011 रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमीत करण्यात आला. आणि अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचा निर्णय देण्यात आला. म्हणून अपीलकर्त्यास दि. 5.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र दिलेली माहिती आणि त्यांनी

मागितलेली माहिती यामध्ये विसंगती असल्याचे त्यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र त्यांना मागितलेल्या माहितीमध्ये आणि जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये नेमकी काय विसंगती आहे याचा कोणताही उहापोह अपीलकर्ता आयोगासमोर करु शकले नाही म्हणून प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून त्यांनी मागितलेली माहिती आणि त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती याचे निरीक्षण करुन घेवून योग्य ती माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात दस्तऐवजांचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणानंतर त्यांना पाहिजे असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
3) अपीलकर्ता यांनी दस्तऐवजांच्या निरीक्षणासाठी जन माहिती अधिकारी यांना लेखी पूर्व सुचना द्यावी आणि जन माहिती अधिकारी यांना लेखी पूर्व सुचना प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दस्तऐवजांचे निरीक्षण करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावे. आणि निरीक्षणाअंती अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1963-1964

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 450 नाग/2011**

श्री शंकर हरदेवराम विश्वकर्मा
अण्णामोड, कॉन्ट्रॅक्टर कॉलनी पो. खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क.3 नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री आर. डी. आत्राम
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी/सदस्य सचिव
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क.3 नागपूर
ता. जि. नागपूर वर्धा भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 2.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 4.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क.3 नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री मोहीत विश्वकर्मा केस नं. 1813 यांच्या जाती प्रमाणपत्र संदर्भात मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्याकडील दि. 25.6.2010 च्या आदेशा नंतर विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क.3 नागपूर यांनी या केस संदर्भात घेतलेल्या सुनावणीच्या रोजनाम्याची प्रत आणि त्यांनी समितीकडे सादर केलेल्या अतिरिक्त कागदपत्रांच्या प्रतींची यादी मागितलेली होती. तथापि त्यांना रोजनाम्याची प्रत मिळाली मात्र सुनावणीच्या वेळी त्यांनी दि. 6.7.2010 च्या पत्राने जाती संदर्भात जी अतिरिक्त कागदपत्रे सादर केली होती त्याची यादी त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे खारीज झाले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.3 नागपूर श्री आर. डी. आत्राम हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री एस. बी. दाभाडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 4.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पुरविण्याच्या संदर्भात अपीलकर्त्यास दि. 27.10. 2010 रोजी माहितीचे शुल्क भरण्याबाबत पत्र दिले आणि त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 5. 2.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्याबाबत अपीलकर्त्याची पोच आयोगापुढे दाखविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांनी दि. 6.7.2010 च्या पत्राने त्यांच्या जाती प्रमाणपत्र संदर्भात अतिरिक्त कागदपत्रे दाखल केलेली होती त्याची यादी त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगा पुढे सांगितले. म्हणून सदरची यादी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दि. 6.7.2010 च्या पत्राने त्यांनी जी अतिरिक्त कागदपत्रे सादर केलेली आहेत त्या कागदपत्रांची यादी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1961-1962

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 263 नाग/2011**

श्री युसुफ एफ. मोहम्मद
C/o. राजेंद्र बाथू, डागा हॉस्पीटलमागे, ज्योती नगर
खदान, हंसापूरी, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी प्राचार्य
हिस्लॉप महाविद्यालय नागपूर
टेंम्पल रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर 440001
2) श्री धनराज माने प्राचार्य
जन माहिती अधिकारी हिस्लॉप महाविद्यालय नागपूर
टेंम्पल रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर 440001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 27.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 2.7.2009 रोजी घेण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री धनराज माने हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 20.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 22.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने दि. 1.7.1998 ते दि. 31.8.1999 या कालावधीची त्यांच्या 5 व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या संदर्भात त्यांनी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन 1998–1999 वर्षाची असल्यामुळे सदरची माहिती ही 12 वर्षापूर्वीची जुनी माहिती होती. म्हणून सदरच्या जुन्या माहितीचा शोध घेण्यात आला आणि अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही 5 व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या संदर्भात असल्यामुळे संपूर्ण जुने रेकॉर्ड शोधण्यास आणि माहिती काढण्यास कालावधी लागला आणि आणि रेकॉर्ड शोधून माहिती संकलीत करण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 21.1.2011 रोजी पत्र

लिहून माहितीचे शुल्क रु. 150/– भरण्याबाबत कळविले. तथापि अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्कचा भरणा केला नाही. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने सहसंचालक उच्च शिक्षण यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. आणि अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळवूनही अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही. व आजपर्यंत माहिती घेतली नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील फेटाळल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

6. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.1.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क रु. 150/– भरण्याबाबत कळविले आहे. मात्र अपीलकर्त्याने माहितीचे शुल्काचा भरणा केलेला नाही. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र 30 दिवसात दिलेले दिसत नाही. म्हणून अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्यासाठी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडल दि. 20.11.2010 च्या माहिती अर्जाप्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1964-1965

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 463 नाग / 2011**

श्री नत्थू भैय्याजी रागीट
33, के व्ही सब स्टेशन, शास्त्रीनगर मुल रोड चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. जी. भोंगाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
स व सु विभाग महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. चंद्रपूर
विद्युत भवन, बाबूपेठ चंद्रपूर
2) श्री ए. टी. काळे
जन माहिती अधिकारी
स व सु विभाग महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. चंद्रपूर
विद्युत भवन, बाबूपेठ चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी स व सु विभाग महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महाराष्ट्र राज्य विज मंडळाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परीपत्रकाच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. त्यामध्ये मुख्यतः दि. 31.3.1973 दि. 24.6. 1977, दि. 21.5.1998, दि. 13.5.1982 इत्यादी परीपत्रकाच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र त्यामध्ये दि. 31.3.1973 आणि दि. 24.6.1977 ही दोन परीपत्रके त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपील त्यांचे खारीज केल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता श्री ए. टी. काळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री आर. जी. भोंगाडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री ए. टी. काळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी कनिष्ठ व्यवस्थापक आस्थापना विभाग यांना दि. 19.1.2011 रोजी पत्र लिहून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन 1973 आणि 24.6.1977 या कालावधीची होती म्हणून सुमारे 30 वर्षापेक्षा अधिक कालावधीची असल्यामुळे आस्थापना विभागाने त्या माहितीचा शोध घेतला आणि अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांचेकडे प्राप्त झाली ती माहिती आस्थापना विभागाने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 4.2.2011 रोजी पाठविली. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु. 116/- भरण्याबाबत पत्राने कळविले. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या शुल्काचे भरणा दि. 11.2.2011 रोजी केला आणि त्याच दिवशी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्याने कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी दि. 11.2.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपील खारीज केल्याचे श्री आर. जी. भोंगाडे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 11.2.2011 च्या पत्राने पाठविण्यात आलेली माहिती त्यांना मिळाल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे मान्य केले. मात्र माहिती अर्जातील मुद्या क्र.1 मधीत नमुद केलेले परीपत्रक दि. 31.3.1973 आणि दि. 24.6.1977 इत्यादीच्या प्रती त्यांना मिळाल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी श्री काळे आणि प्रथम अपीलीय अधिकारी श्री आर. जी. भोंगाडे यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने वर नमुद केलेल्या दोन परीपत्रकाची मागणी केलेली आहे. सदरचे परीपत्रक हे सुमारे 30 वर्षापुर्वीचे असल्यामुळे यांच्या कार्यालयात त्याचा शोध घेवूनही परीपत्रक उपलब्ध झाले नाही म्हणून सदरचे परीपत्रके अपीलकर्त्यास देता आली नाही आणि तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास दि. 11.2.2011 च्या पत्राने कळविलेले आहे. मात्र याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सदरचे परीपत्रके उपलब्ध होवू शकतील म्हणून त्याची खात्री करण्यासाठी अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधीत परीपत्रकाच्या धारीकांचे किंवा परीपत्रकाच्या संचाचे निरीक्षण करुन घेवून त्यात सदरची परीपत्रके मिळाल्यास प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी हजर राहून संबंधीत नस्तीचे किंवा परीपत्रकाच्या संचाचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणाअंती परीपत्रकाच्या प्रती उपलब्ध झाल्यास सदरच्या झेरॉक्स प्रती प्राप्त करुन घ्याव्या.
3) अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपस्थित झाल्यानंतर त्यांना आवश्यक ते दस्तऐवज निरीक्षणासाठी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावे आणि निरीक्षणाअंती त्यांना पाहिजे असलेल्या परीपत्रकाच्या प्रती उपलब्ध झाल्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1967-1969

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 460 नाग/2011**

श्री राधेशाम परसरामजी काबरा
मु. पो. देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सोनवाने
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली
2) श्री गोहणे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार देसाईगंज श्री गोहणे हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज श्री सोनवाने हे उपस्थित आहेत.

3. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 17.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 18.9.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात विरशी तुकुम तलाठयाने दिलेल्या नकाशा संदर्भात 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मंडळ अधिकारी देसाईगंज आणि तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याशी संबंधीत असल्याने सदरची माहिती त्यांचेकडून प्राप्त करण्यासाठी दि. 7.10.2010 च्या पत्राने मंडळ अधिकारी देसाईगंज आणि तालुका निरीक्षक भूमी अभिलेख देसाईगंज यांना पत्र पाठवून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती त्यांचेकडून मागविली आणि या पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देवून त्यांचेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर आपणास माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार देसाईगंज यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले.

4. त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे मंडळ निरीक्षक यांचेकडून माहिती प्राप्त झाली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.10.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती ही प्रमाणीत नाही म्हणून अपीलकर्त्याने परत

केली. त्यानंतर सदरची माहिती प्रमाणीत करुन अपीलकर्त्यास पुन्हा दि. 25.10.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने प्राप्त केल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत दाखविली. तसेच तालुका निरीक्षक भूमी अभिलेख देसाईगंज यांचेकडून जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे दि. 6.12.2010 रोजी माहिती प्राप्त झाली. आणि ती माहिती देखील अपीलकर्त्यास तहसिलदार यांनी दि. 6.12.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. आणि सदरची माहिती देखील अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली.

5. प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांचेकडे दि. 18.11.2010 रोजी दाखल केले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 3.12.2010 आणि दि. 7.12.2010 रोजी घेण्यात आली. आणि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून आल्यामुळे त्यांनी प्रथम अपील फेटाळले असे श्री सोनवाने उपविभागीय अधिकारी यांनी आयोगापुढे नमुद केले.

6. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार देसाईगंज तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.10.2010 आणि दि. 6.12.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1971-1972

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 464 नाग/2011 व अपील क्रमांक 465 नाग/2011**

श्री सुनिल विठ्ठलराव कुंभरे
द्वारा श्री रामदास निमगडे, गणेश मंदीरजवळ
गणेश कॉलनी गोकुळनगर गडचिरोली
ता. जि. गडचिरोली – 442605 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
अप्पर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी सेदेश, पुणे
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 8
2) श्री संजय ना. हांडे
जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक बि.सं.(गृह)
अप्पर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी सेदेश, पुणे
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 8 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.8.2010 रोजी अपील क्रमांक 464 नाग/2011 आणि दिनांक 16.3.2011 रोजी अपील क्रमांक 465 नाग/2011 राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी दोन्ही अपीलाच्या सुनावणीची नोटीस काढून दि. 5.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दोखल केलेल्या दोन्ही अपीलांमध्ये जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलाची सुनावणी आयोगापुढे एकत्रित घेण्यात आली आणि दोन्ही अपीलांचा निर्णय खालीलप्रमाणे निर्गमीत करण्यात आला.

3. **<u>अपील क्रमांक 464 नाग/2011</u>** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक बि.सं.(गृह) कार्यालय अप्पर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी सेदेश, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 18.6.2009 रोजी तक्रार अर्ज सादर करुन पोलीस बिनतारी सेदेश विभागातील बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे अनुसुचित जमाती प्रवर्गाचे आरक्षीत पदाचा लाभ घेणा–यावर

कार्यवाही करण्याचा अर्ज दिला होता त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक अप्पर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी सेदेश, पुणे यांचेकडे दाखल केले. त्यानंतर त्यांना दि. 2.6.2010 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली मात्र सदरची माहिती ही विलंबाने प्राप्त झाली म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक बिनतारी सेदेश, पुणे श्री संजय ना. हांडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने पोलीस निरीक्षक बिनतारी सेदेश, पुणे श्री डी. डी. पवार हे उपस्थित होते.

5. जन माहिती अधिकारी श्री संजय हांडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.1.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 14.1.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही आस्थापना शाखेशी संबंधीत असल्यामुळे आस्थापना शाखेचे प्रमुख यांच्याकडे त्यांनी दि. 15.1.2010 च्या पत्राने अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे पाठवून अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती त्यांच्याकडे पाठविण्यास सांगितले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा आस्थापना शाखेस दि. 25.1.2010, दि. 8.2.2010 आणि दि. 20.2.2010 अशी पत्रे देवूनही आस्थापना शाखेकडून जन माहिती अधिकारी यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील पोलीस अधिक्षक बिनतारी सेदेश, पुणे यांचेकडे दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा आस्थापना शाखेस दि. 13.5.2010 रोजी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास कळविले. त्यानंतर आस्थापना शाखेने दि. 1.6.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 2.6.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र सदरची माहिती सुमारे 4 महिने विलंबाने प्राप्त झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत योग्य ती कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगपुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकत्याच्या दि. 7.1. 2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 2.6.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध झालेली दिसते. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकत्याच्या दि. 7.1.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेला दि. 15.1.2010, दि. 25.1.2010, दि. 8.2.2010 आणि दि. 20.2.2010 अशी चार पत्रे लिहून माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले होते. तथापी आस्थापना शाखेने 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकउे उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर

प्रथम अपील दाखल झाल्यानंतर दि. 1.6.2010 रोजी आस्थापना शाखेने माहिती उपलब्ध करुन दिली. म्हणून 30 दिवसाच्या मुदतीत अपीलकर्त्यास माहिती प्राप्त झालेली नाही. आणि माहिती विलंबाने प्राप्त होण्यास आस्थापना शाखेचे प्रमुख हे जबाबदार दिसून येतात. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5(5) अन्वये आस्थापना शाखेचे प्रमुख यांना जन माहिती अधिकारी असे समजण्यात येत असून त्यांनी विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20(1) अन्वये रु. 10000/- शास्ती लादण्याची कार्यवाही का करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगाकडे सादर करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

7. **<u>अपील क्रमांक 465 नाग/2011</u> –** आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक बि.सं.(गृह) अप्पर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी सेदेश, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन पोलीस बिनतारी सेदेश विभागात अनुसुचित जमातीचे पोलीस उपनिरीक्षकांना या पदावर पदोन्नती दिली त्यांच्या सेवापुस्तकातील पहिल्या पानाची प्रत जात प्रमाणपत्र आणि जात पडताळणी प्रमाणपत्र इत्यादींची त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक अप्पर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस बिनतारी सेदेश, पुणे यांचेकडे दाखल केले. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीच्या शुल्काचा भरणा करण्यास कळविले. त्यांनी माहितीच्या शुल्काचा भरणा दि. 25.2.2011 रोजी केला आणि दि. 28.2.2011 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली मात्र सदरच्या माहिती मध्ये त्यांना माहिती अर्जातील मुद्या क्र. 3 मध्ये नमुद केलेल्या शासन निर्णयाची प्रत त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

8. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक बिनतारी सेदेश, पुणे श्री संजय ना. हांडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने तथा पोलीस निरीक्षक बिनतारी सेदेश, पुणे श्री डी. डी. पवार हे उपस्थित होते.

9. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक बिनतारी सेदेश, पुणे श्री संजय ना. हांडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. त्याचा पुरावा म्हणून त्यांनी आवक जावक शाखेच्या संबंधीत लिपीकाचे अर्ज प्राप्त न झाल्याचे पत्र आणि त्या कालावधीतील आवक जावक रजिस्टरची झरोक्स प्रत आयोगापुढे दाखविली. मात्र त्यामध्ये अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही.

10. त्यानंतर अपीलकर्त्याने पोलीस निरीक्षक बिनतारी सेदेश मुख्यालय, पुणे यांचेकडे

दि. 20.1.2011 रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरचा प्रथम अपीलाचा अर्ज प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दि. 25.1.2011 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही आस्थापना शाखेशी संबंधीत असल्यामुळे दि. 27.1.2011 च्या पत्राने आस्थापना शाखेकडून ती माहिती मागितली. आस्थापना शाखेकडून दि. 11.2. 2011 रोजी माहिती सादर केली आणि त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 15.2.2011 रोजी माहितीचे शुल्क भरण्या कळविले. आणि अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क दि. 25.2.2011 रोजी भरणा केले आणि दि. 28.2.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे श्री डी. डी. पवार पोलीस निरीक्षक यांनी आयोगापुढे सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र माहिती अर्जातील मुद्या क्र. 3 च्या संदर्भात त्यांना अपेक्षित असलेला शासन निर्णय प्राप्त झाला नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

11. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला दिसत नाही. मात्र पोलीस निरीक्षक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक त्या माहितीच्या शुल्काचा भरणा करुन घेवून अपीलकर्त्यास दि. 28.2.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या शासन निर्णयाच्या संदर्भात दि. 24.6.2004 व 24.7.1998 हया दोन शासन निर्णया व्यतिरिक्त इतर शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) <u>अपील क्रमांक 464 नाग/2011</u>

अपील क्रमांक 464 नाग/2011 अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आस्थापना शाखेतील प्रमुख लिपीकाने 30 दिवसाच्या मदतीत जन माहिती अधिकारी यांचेकडे का माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध झालेली दिसून येते आणि सदरच्या विलंबाचा कालावधी हा सुमारे 4 महिन्याचा दिसून येतो म्हणून माहिती विलंबाने उपलब्ध होण्याच्या कारणास्तव प्रमुख लिपीक हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5(5) अन्वये जन माहिती अधिकारी समजून त्यांच्या विरुध्द कलम 20 (1) अन्वये रु. 10000/- शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा.

2) विद्यमान जन माहिती अधिकारी श्री संजय हांडे तथा पोलीस निरीक्षक बिनतारी सेदेश, पुणे यांनी सदरच्या निर्णयाची एक प्रत आस्थापना शाखा प्रमुखाकडे खुलासा सादर करण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे अप्पर पोलीस महासंचालक तथा संचालक पोलीस बिनतारी सेदेश, पुणे यांचेकडे योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

4) **<u>अपील क्रमांक 465 नाग/2011</u>**
अपील क्रमांक 465 नाग/2011 अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या शासन निर्णयाच्या संदर्भात दि. 24.6.2004 व 24.7.1998 हया दोन शासन निर्णया व्यतिरिक्त इतर शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1974-1978

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 467 नाग/2011**

कु. सुषमा उत्तम मडामे
मु. पो. बाम्पेवाडा
ता. साकोली जि. भंडारा – 441802 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अ. न. गोहत्रे
प्रथम अपीलीय अधिकारी
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ भंडारा
ता. जि. भंडारा
2) श्री अशोक परशुरामे
जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक 11.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.12.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मुलाखत यादीनुसार माझा क्र. 194 आहे व मुलाचे क्र. 193 आहे महिला आरक्षणानुसार ते पद माझ्या क्रमांकाला लागू आहे. तरी ते देण्यात यावे व मला पुढील संधी प्राप्त व्हावी तसेच खुला वर्ग व अनुसूचित जाती यांची निवड व माझी गुणवत्ता यादी लेखी तोंडी यादी सहीत द्यावी अशा प्रकारची माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 10.1.2011 चे पत्र पाठविले आणि त्यामध्ये असे नमुद केले की आपण दि. 22.1.2011 रोजी या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे जेणेकरुन माहितीच्या अधिकारात वर्णन केलेली माहिती आपणास समजावून घेता येईल त्यानंतर अपीलकर्ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्या. मात्र त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी श्री अशोक परशुरामे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक श्री गोहत्रे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री अशोक परशुरामे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 17.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 23.12. 2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्तीने वाहक पदाच्या भरती प्रक्रिये संदर्भात माहिती मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी त्यांना निश्चित सवरुपात कोणती माहिती हवी

आहे याचा बोध होत नव्हता म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दि. 10.1.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण दि. 22.1.2011 रोजी या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे जेणेकरुन माहितीच्या अधिकारात वर्णन केलेली माहिती आपणास समजावून घेता येईल. कारण अपीलकर्तीने माहितीच्या अर्जामध्ये प्रत्यक्ष माहिती घेण्याचे नमुद केले होते म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 10.1.2011 च्या पत्राने त्यांच्या कार्यालयात बोलाविले. तथापी अपीलकर्ती कार्यालयीन वेळेत उपस्थित झाल्या नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपीलाचा अर्ज विभाग नियंत्रक यांच्याकडे न करता तो पुन्हा जन माहिती अधिकारी यांचेकडे केला. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दि. 21.2.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्तीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्तीस वाहक पदाच्या निवडीसाठी महिला आणि पुरुष खुल्या व अनु.जाती गटातून तोंडी व लेखी यांच्या गुणाच्या आधारे निवड केलेल्या उमेदवारांची यादी पाहिजे आहे. ती यादी त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्तीने आयोगापुढे सांगितले.

5. अपीलकर्ती तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्तीस वाहक पदाच्या निवडीसाठी निवड केलेल्या अनु.जाती व खुल्या वर्गातील महिला आणि पुरुष यांना मिळालेल्या तोंडी व लेखी गुणांसह निवड केलेल्या उमेदवारांची यादी गुणक्रमानुसार उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस वर नमुद केल्याप्रमाणे वाहक पदासाठी निवड केलेल्या महिला आणि पुरुष उमेदवारांची यादी विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1987-1988

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 473 नाग/2011**

श्री दिगंबर नत्थू रामटेके
रा. कुंभार नगर पिंपरारोड श्री राहुल देशभ्रतार यांच्या घरासमोर तुमसर
पो. ता. तुमसर जि. भंडारा –441912 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री चंद्रीकापुरे उपसचिव तथा प्रशासकीय अधिकारी
प्रथम अपीलीय अधिकारी
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
4 था मजला, एक्सप्रस टॉवर्स, नरीमन पॉईंट मुंबई 400021
2) श्री वेलके कक्ष अधिकारी
जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सिडको भवन(दक्षिण कक्ष) बेंलापूर नवी मुंबई ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई श्री वेलके हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई श्री चंद्रीकापुरे हे उपस्थित आहेत.

4. जन माहिती अधिकारी श्री वेलके यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 23. 10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. मात्र सदरचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागपूर यांच्या कार्यालयाकडून दि. 25.10.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही कार्यासन अधिकारी आस्थापना–3 यांचेशी संबंधीत असल्याने त्यांचेकडे सदरचा माहितीचा अर्ज पाठवून माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले व त्याची प्रत अपीलकर्त्यास माहितीसाठी उपलब्ध करुन दिली. त्यानुसार त्यांच्याकडून जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 18.1.2011 रोजी माहिती प्राप्त झाली तथापी सदरची माहिती ही साक्षांकीत नसल्याने संबंधीताकडे साक्षांकीत करण्यासाठी पाठविली आणि त्यांच्याकडून सदरची माहिती साक्षांकीत होवून आल्यानंतर अपीलकर्त्यास दि. 9.2.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली.

5. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने प्रथम अपील प्रशासकीय अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेतली आणि सुनावणी नंतर दि. 17.3.2011 रोजी आदेश निर्गमीत केले प्रथम अपीलाच्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी

असे नमुद केले की अपीलकर्ता यांची मुख्यप्रशासकीय अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांना त्यांची आगावू वेतन वाढ रद्द केल्या प्रकरणी अधिक्षक अभियंता परीमंडळीय अध्यक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण औरंगाबाद यांना योग्य ते आदेश देवून त्यांची रद्द केलेली वेतन वाढ पुर्नजिवित करण्याबाबत सुचविण्याची कृती नियमाधीन नाही व ती माहितीच्या अधिकारात देखील मोडत नाही. अधिक्षक अभियंता औरंगाबाद यांनी दि. 29.11.2005 रोजीच्या परीमंडळीय बैठकीत श्री रामटेके यांची वरील मागणी अमान्य केली आहे. त्यामुळे त्यांचे पत्रातील विनंती नुसार त्यांची रद्द केलेली आगावू वेतन वाढ पुर्नजिवित करण्याबाबत अधिक्षक अभियंता औरंगाबाद यांना कळविण्याचा प्रश्न उदभवत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात नमुद केले.

6. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांची रद्द केलेली आगावू वेतन वाढ पुर्नजिवित करण्याबाबत अधिक्षक अभियंता औरंगाबाद यांना आदेश देण्यात यावे अशी त्यांची मुळ मागणी आहे. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयात नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांच्या पत्रातील विनंती नुसार त्यांची रद्द केलेली आगावू वेतन वाढ पुर्नजिवित करण्याबाबत अधिक्षक अभियंता औरंगाबाद यांना कळविण्याची बाब ही माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नाही. म्हणून सदर बाबतीत अपीलकर्त्याने योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 9.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1990-1991

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 475 नाग/2011**

ॲड. मानसी आर. खराबे
द्वारा बी.डी.पंडीत, निर्मलप्रभा, आयचित मंदिर जवळ,
महाल, नागपूर
ता. जि. नागपूर –440032 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गोस्वामी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक
नगर रचना विभाग महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री भूते
जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता
नगर रचना विभाग महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक 23.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. रीदीमा देशपांडे हया हजर होत्या. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता नगर रचना विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा चिचभवन येथील प्लॉट नं. 1 ख. नं.71/1 प.ह.नं.43 सिटी सर्व्हे नं. 126 शीट नं. 382/35 वर बांधकाम करण्यास परवानगी दिलेल्या आराखडयाची प्रत मागितलेली होती. तथापि त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक संचालक नगर रचना विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता नगर रचना विभाग महानगर पालिका नागपूर श्री भूते हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना विभाग महानगर पालिका नागपूर श्री गोस्वामी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री भूते यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्तीचा दि. 30.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्तीस पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात कोणत्या वर्षाच्या बांधकाम मंजूरीच्या संदर्भात नकाशाची प्रत पाहिजे आहे त्या वर्षाचा तपशिल त्याचप्रमाणे बिल्डींग बांधकाम परवानगी नंबर इत्यादीचा तपशिल नसल्यामुळे अपीलकर्तीस दि. 7.9.2010 च्या पत्राने सदरचा तपशिल त्यांच्याकडे पुरविण्यास कळविले. तथापी अपीलकर्तीने कोणताही तपशिल सादर केला नाही. मात्र त्यानंतर अपीलकर्तीने प्रथम अपील सहाय्यक संचालक नगर रचना विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे

दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली मात्र सुनावणीला अपीलकर्ती हे गैरहजर होते. तथापी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेवून प्रथम अपीलाचा निर्णय दि. 22.12.2010 रोजी पारीत केल्याचे श्री गोस्वामी यांनी आयोगापुढे सांगितले आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहिती बाबत बांधकाम परवानगी रजिस्टर मधील अचुक माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी अपीलकर्तीने बांधकाम परवानगी रजिस्टरचे निरीक्षण करुन घ्यावे. मात्र अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात बांधकाम परवानगी रजिस्टर पाहण्यासाठी उपस्थित राहीले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. अपीलकर्ती यांचे वकील तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपस्थित राहून बांधकाम परवानगी रजिस्टरचे निरीक्षण करुन घेवून निरीक्षणाअंती त्यांना पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अपीलकर्ती यांनी जन माहिती अधिकारी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी व कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून बांधकाम परवानगी रजिस्टरचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणाअंती त्यांना पाहिजे असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी बांधकाम परवानगीच्या संदर्भातील सर्व रजिस्टर अपीलकर्तीस निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे.

3) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1993-1994

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 474 नाग/2011**

श्री पॅंथर प्रकाश बन्सोड
180 उंटखानाख मेडीकल कॉलेज रोड, नागपूर
ता. जि. नागपूर – 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सावरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती पी. एन. अवझे अव्वल कारकून
जन माहिती अधिकारी तथा विशेष भूअर्जन अधिकारी(जि.प.कामे)
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 16.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा विशेष भूअर्जन अधिकारी(जि.प.कामे) जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन प.ह.नं.31 मौजा सेडेश्वर ता. उमरेड जि. नागपूर येथील सर्व्हे नं. 148 शेत जमीन संपादनाचा भूअर्जन मामला या संदर्भात 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयात 1 ते 6 मुद्यांची माहिती प्राप्त झाली मात्र अपूर्ण माहिती विलंबाने प्राप्त झाली म्हणून जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीच्या अधिकारान्वये कार्यवाही करावी असे त्यांनी नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्रीमती पी. एन. अवझे हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी श्री सावरकर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून श्रीमती पी. एन. अवझे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 16.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 31.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीतील मुद्दे हे त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 23.12.2010 च्या पत्राने त्रयस्थ पक्षास माहिती देण्याबाबत विचारणा केली. त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 4.2.2011 च्या पत्राने 1 ते 3 मुद्यांची माहिती देण्यात आली आणि प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर दि. 18.2.2011 च्या पत्राने सर्व मुद्यांची माहिती पुरविल्याचे त्यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी आयोगा पुढे असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. 4.2.2011 चे पत्र त्यांना दि. 5.2.2011 रोजी मिळाले. सदर पत्रात तीनच मुद्यांची माहिती दिली आणि दि. 18.2.2011 च्या पत्राने दिलेली माहिती दि. 23.2.2011 रोजी मिळाली. मात्र सदरची माहिती ही 30 दिवसाच्या मुदतीत मिळाली नाही आणि अपुर्ण माहिती मिळाली आणि विलंबाने उपलब्ध करुन दिली म्हणून जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी नमुद केले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी श्री सावरकर यांनी आयोगा पुढे असे सांगितले की प्रथम अपीलाची सुनावणी घेवून दि. 10. 2.2011 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. आणि त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 6 मुद्यांवरील माहिती विनामुल्य पुरविण्याचे आदेश दिले होते असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 16.12.2010 च्या अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील माहिती दि. 4.2. 2011 च्या पत्राने फक्त 3 मुद्यांची माहिती दिली. बाकी 3 मुद्यांची माहिती त्यांनी दिलेली नाही. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर दि. 18.2.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास 1 ते 6 मुद्यांची माहिती पुन्हा उपलब्ध करुन दिलेली दिसते. म्हणून अपीलकर्त्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही तसेच म्हणून या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. या विलंबाबद्यल तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे नमुद केंले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे माहिती पुरविण्यास विलंब झालेला होता. तथापी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही कारण माहितीच्या अधिकारामध्ये अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. म्हणून विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. तसेच अपीलकर्त्यास दि. 18.2.2011 च्या पत्राने 1 ते 6 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी ज्या मुद्याच्या संदर्भामध्ये कागदपत्र उपलब्ध नाही त्या संदर्भात तशी वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तसेच माहिती अर्जातील मुद्या 1 ते 6 च्या संदर्भात ज्या मुद्याची कागदपत्र उपलब्ध नाहीत त्याची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावी.
2) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शास्तीस शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
3) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे. त्यासाठी या निर्णयाची एक प्रत स्वतत्रंपणे **जिल्हाधिकारी नागपूर** यांचेकडे पाठविण्यात येत आहे.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1996-1998

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 476 नाग/2011**

श्री नरेन्द्र नामदेवराव राजूरकर(बन्डे)
गांधी वार्ड मेन रोड चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर –442903 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी
पंचायत समिती चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) श्री पी. डब्ल्यु. आलीवार
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 10.1.2011 आणि दि. 11.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत चिमूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 10.1.2011 च्या अर्जात 12 वा वित्त आयोग अनुदानाची 1 एप्रिल 2009 ते 31.12.2010 या कालावधीत कोणत्या कामावर खर्च केलेला आहे त्याबाबत माहिती मागितलेली होती. तसेच दि. 11. 1.2011 च्या अर्जान्वये दलीत वस्तीच्या अनुदानाबाबत कोणत्या कामावर खर्च झोलेला आहे त्याबाबत माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना 30 दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती चिमूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 11.3.200 रोजी निर्गमीत करण्यात आला. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्यास 3 दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. तथापी त्यानंतरही त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. आणि माहिती देण्यास विलंब झाल्याबद्यल जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी अशी मागणी त्यांनी आयोगाकडे केली.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत चिमूर श्री आलीवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी श्री बोबडे हे उपस्थित होते.

4. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री आलीवार यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे वर नमुद केलेले दोन माहितीचे अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झोला होते. त्या अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून डी. एम. भोयर हे कार्यरत होते. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दि. 30.6. 2011 रोजी ग्राम विकास अधिकारी म्हणून पदभार स्वीकारलेला असल्याचे त्यांनी आयोगा पुढे नमुद केले.

5. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेली होती आणि दि. 9.3.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास ती माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पाठविली. तथापी अपीलकर्त्याने सदरची माहिती त्या दिवशी घेतली नाही असा शेरा संबंधीत लिपीकाने दि. 9.3.2011 च्या पत्रा वर नमुद केलेला आहे. मात्र याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की संबंधीत लिपीक सदरची माहिती त्यांना देण्यासाठी दि. 9.3.2011 रोजी त्यांचेकडे आले नाही किंवा माहिती घेवून जाण्याबाबत त्यांना लेखी पत्र देखील दिलेले नाही. त्यावर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलकर्त्यास दि. 25.4.2011 च्या पत्राने माहिती घेवून जाण्याबाबत कळविलेले होते. त्याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यामुळे ते माहिती घेण्यास जन माहिती अधिकारी यांचेकडे गेले नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले .

6. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती चिमूर दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 11.3.2011 रोजी घेण्यात आली प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्यास 3 दिवसात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश निर्गमीत केल्याचे श्री बोबडे यांनी आयोगा पुढे सांगितले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की दि. 10.1.2011 आणि दि. 11.1.2011 माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आयोगा समोर माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत उपलब्ध झालेली नाही. माहिती विलंबाने उपलब्ध झालेली दिसून येते आणि त्या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री डी. एम. भोयर हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/— ची शास्तीची कार्यवाही कां करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी

आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात सादर करणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री डी. एम. भोयर यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर आयोगा समोर आजच्या सुनावणीत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे. या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री डी. एम. भोयर हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 5000/- ची शास्तीची कां लादू नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात सादर करावा. अन्यथा शास्ती कायम करण्यात येईल.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री डी. एम. भोयर यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.1997-1999

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 485 नाग/2011**

श्री हरीदास केशव लाडे
रा. अर्जुनी/मोर. आंबेडकर चौक
ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी
उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया श्री नागपूरे अव्वल कारकून हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 28.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 6.1. 2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने या अर्जात उपविभागीय अधिकारी साकोली यांचे मौजा अर्जुनी/मोर. मा.क्र.4/एलएनए–22/76–77 या केसच्या संदर्भात 1 ते 7 मुद्यांवर दस्तऐवजाची माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 31.1.2011 च्या पत्राने 1 ते 16 पेजेस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 25.2.2011 आणि दि. 23.3.2011 घेण्यात आली मात्र अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे अपील फेटाळण्यात आले. मात्र त्यानंतर अपीलकर्ता हे कार्यालयात

हजर झाल त्यावेळी त्यांना दि. 31.1.2011 च्या पत्राने माहिती पाठविल्या बाबत जन माहिती अधिकारी यांना सांगितले तथापी माहिती अर्जातील 1 ते 7 मुद्यांची मुद्येनिहाय माहिती त्यांना देण्यात यावी असे अपीलकर्त्याने सांगितले. त्याला अनुसरुन पुन्हा दि. 21.6.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील 1 ते 7 मुद्यांची उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने प्राप्त केल्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविली.

4. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2001-2002

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 487 नाग/2011**

श्री मनोहर शामराव मंथनवार
तर्फे श्री गोपाल सोनवाने, हनुमान मंदिर जवळ,
राजगोपालाचारी वार्ड, भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त(रोहयो)
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक
ता. जि. नाशिक
2) श्रीमती जाधव
जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(रोहयो)
विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक
ता. जि. नाशिक ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन पाझरतलाव ढाकणवाडी तालुका पाथर्डी येथील रोहयो संदर्भात 1 ते 9 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.10.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण अर्जात मागणी केलेली माहिती या कार्यालयात हस्तलीखीत वा टंकलीखीत केलेली नाही म्हणून आपल्या अर्जात मागणी केलेली माहिती मुद्या क्र. 1 ते 7 व 9 ची माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याने आपणास सदरची माहिती देता येत नाही असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.10.2010 च्या पत्राने कळविले. आणि मुद्या क्र. 8 च्या माहिती बाबत म्हणजे विभागीय चौकशी अहवाल प्राप्ती नंतर अंतीम कार्यवाहीच्या आदेशा करीता सादर झालेल्या

कार्यालयीन टिपणीची प्रत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. 27.10.2010 च्या पत्राने उपलब्ध झाली. मात्र त्या मध्ये तांत्रीक शाखेची टिपणी त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी तांत्रीक शाखेची टिपणी मागितली. सदरची टिपणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यानंतर प्राप्त झाली मात्र मुद्या क्र. 1 ते 7 व 9 ची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उप आयुक्त(रोहयो) यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलामध्ये दि. 7.1.2011 रोजी असा निर्णय दिला की अपीलकर्त्यास 1 ते 9 मुद्यांवर माहिती विनामुल्य 7 दिवसात उपलब्ध करुन द्यावी. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार(रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग नाशिक श्रीमती जाधव हया उपस्थित होत्या. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.9. 2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 12.10.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली बहुतांश माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे सदरची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास दि. 18.10.2010 च्या पत्राने कळविले. व मुद्या क्र. 8 ची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 27.10.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. तसेच मुद्या क्र. 8 च्या संदर्भात तांत्रीक शाखेच्या तांत्रीक अभिप्रायाची टिपणी देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

4. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उप आयुक्त(रोहयो) यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. सदरच्या सुनावणीची नोटिस अपीलकर्त्यास उशिरा प्राप्त झाल्यामुळे ते सुनावणीस हजर राहू शकले नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय दि. 7.1.2011 रोजी देण्यात आला. आणि त्यामध्ये अपीलकर्त्यास 1 ते 9 मुद्यांची माहिती 7 दिवसात उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमुद केले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री बेंडकुळे यांनी आयोगापुढे सांगितले.

5. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 21.1.2011 च्या पत्राने 1 ते 9 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. सदरचे दि. 21.1.2011 चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे आयोगापुढे त्यांनी मान्य केले. मात्र त्यामध्ये संपूर्ण माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्त्याच्या दि. 30.9.2010 च्या माहितीच्या अर्जचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती मध्ये काही मुद्यांची माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाचे असल्याचे दिसून येते. म्हणून त्याबाबत विभागीय चौकशी नियम

पुस्तिका नियमावली 1991 व महाराष्ट्र नागरी सेवा नियम (अपील व शिस्त) नियम 1979 यामधील तरतुदी अवलोकन कराव्या असे जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास कळविल्याचे दिसून येते. तसेच ज्या मुद्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यानी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्त्याने जी प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितलेली आहे त्याबाबत अपीलकर्त्याने विभागीय चौकशी नियम पुस्तिका नियमावली 1991 व महाराष्ट्र नागरी सेवा नियम (अपील व शिस्त) नियम 1979 चे अवलोकन करणे सुयुक्तिक व योग्य होईल. तथापी जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2001-2003

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 490 नाग/2011 आणि अपील क्रमांक 491 नाग/2011

श्री सुरेश बुलचंद मोटवानी
साईनगर वार्ड आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री कारडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा
2) श्री वि. पी. हुड अव्वल कारकुन
जन माहिती अधिकारी
उपविभागीय अधिकारी कार्यालय आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये अपील क्रमांक 490 नाग/2011 आणि अपील क्रमांक 491 नाग/2011 अशी दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. वर नमुद केलेल्या दोन्ही अपीलांमधील माहितीचा विषय हा एकच असल्यामुळे आणि अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रिम सुनावणी घेण्यात आली.

3. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 19.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय आर्वी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली दोन स्वतंत्र अर्ज दाखल करुन त्यामध्ये त्यांनी असे नमुद केले की त्यांनी दि. 1.9.2010 रोजी स्वस्त धान्य दुकानदार श्री एस. आय. माखीजा हनुमान वार्ड आर्वी यांच्या विरुध्द तक्रार दाखल करुन ते शासनाशी धोखाधडी करीत असून त्यांचेवर फोजदारी गुन्हा दाखल करुन परवाना रद्य करण्या बाबत माहिती मागितलेली होती. त्या माहिती मध्ये तक्रार अर्जावर केलेल्या

कार्यवाहीची कार्यालयीन टिपणी वरीष्ठ अधिकारी यांचे अभिप्राय तपासणी अहवाल बयाण आणि आदेश इत्यादींच्या झेरॉक्स कॉपी मागितलेल्या होत्या. आणि संबंधीता विरुध्द आर्वी पोलीस स्टेशनला फाजदारी गुन्हा दाखल केल्याच्या केसच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या होत्या. तथापि त्यांना फक्त बयाणाच्या प्रती विलंबाने उपलब्ध झाल्या मात्र कोणतीही माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय आर्वी श्री वि. पी. हुड अव्वल कारकुन हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी आर्वी श्री कोरडे हे उपस्थित होते.

5. जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय आर्वी श्री वि. पी. हुड यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 19.10. 2010 चे दोन्ही माहितीचे अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. परंतू अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही तहसिलदार आर्वी कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्या कार्यालयातील तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 28.10. 201 च्या पत्राने अपीलकर्त्याचे माहितीचे दोन्ही अर्ज तहसिलदार आर्वी यांचेकडे पाठवून अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत कळविले होते व त्याची प्रत अपीलकर्त्यास देण्यात येवून त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले.

6. तहसिलदार आर्वी कार्यालयात त्यांचे माहितीचे अर्ज प्राप्त झालेले दिसते आणि तहसिलदार आर्वी कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी दि. 10.11.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास बयाणाच्या प्रती पोस्टाद्वारे पाठविलेल्या आहेत आणि सदरच्या बयाणाच्या प्रती अपीलकर्त्यास दि. 20.11.2010 रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगा समोर सांगितले

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय आर्वी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी आर्वी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 10.10.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय यांच्याकडून बयाणाच्या प्रती पाठविलेल्या दिसतात. मात्र त्यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्याचप्रमाणे संबंधीता विरुध्द फौजदारी गुन्हा केला किंवा कसे याबाबतची कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. सदरची दिलेली माहिती ही अपूर्ण दिलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तहसिलदार आर्वी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 19.10.200 च्या दोन्ही अर्जातील संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) जन माहिती अधिकारी तहसिलदार आर्वी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 19.10. 2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत माहिती अपीलकर्त्यास दिलेली दिसून येत नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये शास्तीची कार्यवाही कां करु नये याबद्यलचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे मुदतीत आयोगाकडे सादर करावा.
3) अपीलकर्त्याने प्रस्तूत प्रकरणात अपील दाखल केलेले दिसून येते. तथापी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही म्हणून तहसिलदार आर्वी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये त्यांचेकडे सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही त्या कारणास्तव त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे. सदरच्या निर्णयाची एक प्रत **जिल्हाधिकारी वर्धा** यांचेकडे पाठविण्यात यावी.
4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **उपविभागीय अधिकारी आर्वी** यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तहसिलदार आर्वी कार्यालय यांचेकडे खुलासा करण्यासाठी पाठवावी.
5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2005-2007

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 488 नाग/2011**

श्री दिनेश हरिदास पाटील
डॉ.बाबसाहेब आंबेडकर नगर (रमानगर)
रेल्वे चौकी, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डॉ. व्ही. आर. झारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक
आरोग्य सेवा (हिवताप) नागपूर
माताकचेरी, दिक्षाभुमी, नागपूर वर्धा भंडारा गोंदिया चंद्रपूर गडचिरोली
2) श्रीमती एम. एम. शहारे
जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी,
नागपूर
माताकचेरी, दिक्षाभुमी, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन बहुउद्येशीय शासकीय कर्मचारी पुरुष उमेदवारांनी हंगामी फवारणी करण्यासाठी केलेल्या कामाच्या संदर्भात हजेरी रहिस्टरची सत्यप्रत त्यामध्ये अनु. जाती आणि इतर मागास वर्गीय उमेदवारांची यादी त्यानंतर 24 सप्टेंबर 2003 रोजी आरोग्य कर्मचारी पुरुष पदाच्या मुलाखतीच्या निकषा संदर्भातील माहिती इत्यादी बाबत एकुण 1 ते 7 मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना अपेक्षेप्रमाणे आणि विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) नागपूर यांचेकडे दि. 10.2.2011 रोजी दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, नागपूर श्रीमती एम. एम. शहारे आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती चारमोडे हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) नागपूर डॉ. व्ही. आर. झारे हे उपस्थित होते.

4. अपीलकर्त्यास प्राप्त झालेली माहिती ही अपुर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) नागपूर यांचेकडे दाखल केलेले होते. म्हणून प्रथम अपीलाची सुनावणी घेवून अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेली

माहिती बाबत खात्री करुन निर्णय देणे अपेक्षित होते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत आहे. तथापी विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी 10 दिवसाच्या आत प्रथम अपीलाची सुनावणी घेवून त्या सुनावणीमध्ये अपीलकर्ता आणि जन माहिती अधिकारी यांना बोलावून त्यांचे म्हणणे एकून घेवून अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने योग्य ते आदेश निर्गमित करणे योग्य होईल म्हणून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आ दे श**

1) विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (हिवताप) नागपूर यांनी 10 दिवसात प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय निर्गमित करावा.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2007-2008

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 495 नाग/2011**

श्री अरुण श्रीराम ढोरे
C/o. केलास चापले, 21, डॉक्टर कॉलनी
छत्रपतीनगर नागपूर
ता. जि. नागपूर –11 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. आर. राठोड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी उपविभाग दिग्रस
ता. दिग्रस जि. यवतमाळ
2) श्री एस. पी. राठोड
जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी उपविभाग दिग्रस
ता. दिग्रस जि. यवतमाळ ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 12.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 8.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी उपविभाग दिग्रस यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दिग्रस ते कलगाव 33 के.व्ही. विद्युत विहिनी संदर्भात अ,ब,क,ड,ग,इ,एफ अशा 6 मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना दि. 22. 12.2010 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली होती. मात्र सदरची माहिती ही अपुर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील सहाय्यक अभियंता यांचेकडे दाखल केले होते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीला मध्ये अपीलकर्ता यांनी इंफ्रा प्लान बाबत मागितलेली माहिती विभागीय कार्यालय पुसद यांचेकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्ता यांना देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांना दि. 30.6.2011 रोजी सदरची माहिती मिळाली मात्र त्यापूर्वीच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे त्यांनी नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री एस. पी. राठोड हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री एस. आर. राठोड हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री एस. पी. राठोड यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 8.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती हे विभागीय कार्यालय पुसद यांचेशी संबंधीत असल्यामुळे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज माहिती अधिकारी विभागीय कार्यालय पुसद यांचेकडे दि. 10.11.2010

च्या पत्राने पाठवून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले. व त्याची प्रत अपीलकर्त्यास देवून माहिती संकलणाचे काम सुरु आहे माहिती उपलब्ध होताच आपणास देण्यात येईल असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याचे आयोगापुढे सांगितले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांचेकडे मुद्या क्र. अ आणि क ची माहिती प्राप्त झाली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास दि. 22.12.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन देण्यात आली. त्यानंतर पुन्हा अपीलकर्त्यास माहितीचे संकलण झाल्यानंतर मुद्या क्र. ब आणि ई ची माहिती दि. 14.1.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली आणि त्यानंतर दि. 5.2.2011 च्या पत्राने मुद्या क्र. अ, ब, क, ई आणि फ ची माहिती देखील उपलब्ध करुन दिली आणि त्यानंतर पुन्हा प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार मुद्या क्र. ड ची माहिती दि. 30.6.2011 रोजी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्त्यास पुरविण्यात आलेलया नकाशामध्ये मोजमाप दिसून येत नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. तथापी त्यावर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या नकाशाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी संकलीत करुन वर नमुद केल्याप्रमाणे वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी नकाशाच्या गुणवत्ते बाबतची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2010-2011

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 507 नाग/2011**

श्री महेन्द्र गादीराम कांबळे
मु. झांजिया पो. सोनी
ता. गारेगांव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती गारेगांव
ता. गारेगांव जि. गोंदिया
2) श्री बी. एस. फटींग
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत झांजिया पो. सोनी
ता. गारेगांव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.
.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत झांजिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत झांजिया कडून सामान्य फंड, पाणी पुरवठा फंड, 12 वा वित्त आयोग, दलीत वस्ती इत्यादी फंडाची सन 2007–2008 ते 09–10 ची जमाखर्चाची बिल व रोकड बुक, लेजर बुकची झेरॉक्स प्रत माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांचेकडून उपरोक्त माहिती दि. 12.3.2011 रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर सांगितले. मात्र त्यातील काही झेरॉक्स प्रती अस्पष्ट असल्याचे सांगितले. तसेच अपीलकर्ता हे दारीद्रय रेषे खालील असल्यामुळे सदरची माहिती त्यांनी विनामुल्य मागितलेली होती.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत झांजिया श्री बी. एस. फटींग हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती गारेगांव यांच्या वतीने श्री मरसकोल्हे कक्ष अधिकारी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत झांजिया श्री बी. एस. फटींग यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 15.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतच्या फंडा विषयी सन 2007–2008 ते 09–10 ची माहिती मागितलेली होती. अपीलकर्ता हे दारीद्रय रेषे खालील असल्यामुळे अपीलकर्त्यास माहिती विनामुल्य द्यावयाची होती. तथापी ग्रामपंचायतीला झेरॉक्स प्रती साठी रु. 1400/– ते 1500/– खर्च अपेक्षित होता. मात्र त्यावेळी ग्रामपंचायतकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी दि. 12.11.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की सद्या ग्रामपंचायत सामान्य फंडात रु. 628/– शिल्लक आहेत. तथापी आपण मागितलेल्या माहिती करीता

झेरॉक्स खर्च अंदाजे रु. 1400/— ते 1500/— खर्च अपेक्षित आहे. करीता ग्रामपंचायत फंडात निधी उपलब्ध झाल्यानंतर आपण मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढून माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने खंड विकास अधिकारी पंचायत समिती गारेगांव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 14.2.2011 च्या पत्राने सचिव ग्रामपंचायत यांना अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती अर्जातील माहिती संकलीत केली आणि सदरच्या माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्यात आल्या आणि ती संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास दि. 12.3.2011 रोजी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढ सांगितले. दि. 12.3.2011 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. तसेच आयोगा समोर अपीलकर्त्यास पुन्हा माहितीच्या स्पष्ट झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन दिल्या. त्या अपीलकर्त्याने आयोगा समोर स्विकृत केल्या.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत झांजिया यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 12.3.2011 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2014-2015

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 508 नाग/2011**

श्री सारंग भाउराव दाभेकर
गांधी वार्ड चिमूर
पो. ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
शारदा अंबिका पॉवर प्रोजेक्ट प्रा.लि.चिमूर, एमआयडीसी चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक
शारदा अंबिका पॉवर प्रोजेक्ट प्रा.लि.चिमूर, एमआयडीसी चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी या कार्यालयाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलातील कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसून येते की अपीलकर्त्याने शारदा अंबिका पॉवर प्रोजेक्ट प्रा.लि.चिमूर, एमआयडीसी चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर या प्रायव्हेट कंपनीबाबत माहिती मागितलेली दिसून येते. तथापी आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे सदरच्या प्रायव्हेट कंपनीस शासनाकडून काय वित्तीय सहाय्य मिळालेले आहे याबाबत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. सदरची कंपनी ही प्रायव्हेट कंपनी दिसून येते. तसेच आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असून त्यांना माहितीची आवश्यकता दिसून येत नाही. म्हणून सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2016-2017

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 509 नाग/2011**

सौ. चंद्रकलाबाई बबन माथने
जगन्नाथबाबा नगर, विद्यानगर वार्ड, दाताळा रोड चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. पी. ब–हाटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
स. व सु. प्रविभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.
बल्लारशाह रोड चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री ए. टी. काळे उपकार्यकारी अभियंता
जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
स. व सु. विभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.
बाबुपेठ चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 6.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 13.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने श्री आर. पी. ठाकरे यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 30.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन) अधिक्षक अभियंता कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन टाटा इंडीकॉम या कंपनीचा मोबाईल टावर श्री सु.जे.पवार यांचे घरावर लावलेला आहे त्याला विजेचे कनेक्शन सुध्दा देण्यात आले त्यासाठी 11 कें.व्ही. ची वेगळी लाईन टाकण्यात येवून ट्रान्सफॉर्मर सुध्दा लावण्यात आला त्याबाबत त्यांनी अ,ब,क,ड,इ,ई आणि उ अशी एकुण 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र टाटा इंडीकॉम कंपनीच्या मोबाईल टावरला जी

विज दिलेली आहे ती नियमबाहय दिलेली आहे. त्यामध्ये नगर पालिकेच्या विज पुरवठयाबाबत ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. तरी देखील त्यांना विज पुरवठा केला म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. आणि त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. चंद्रपूर तर्फे श्री ए. टी. काळे उपकार्यकारी अभियंता हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता श्री बी. पी. ब—हाटे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री ए. टी. काळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.11.2010 चा माहितीचा अर्ज अधिक्षक अभियंता चंद्रपूर यांच्या कार्यालयाकडे दि. 4.12.2010 रोजी प्राप्त झाला. आणि अधिक्षक अभियंता कार्यालयाने दि. 6.12.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय चंद्रपूर यांच्याकडे पाठविला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी संचलन व सुव्यवस्था उपविभाग क्र.2 चंद्रपूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे दि. 13.12.2010 च्या पत्राने सदरचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे पाठविला. त्यांच्याकडून अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती दि. 4.1.2011 रोजी प्राप्त झाली. म्हणून दि. 4.1.2011 ला अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु. 28/— भरण्याबाबत पत्र दिले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने दि. 24.1.2011 ला माहितीचे शुल्क भरले आणि अपीलकर्त्यास दि. 27.1.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले. दि. 27.1. 2010 च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की टाटा इंडीकॉम कंपनीच्या मोबाईल टावरला विज पुरवठा देतांना नगर पालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. तरी देखील त्यांना विज पुरवठा देण्यात आलेला आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता श्री बी. पी. ब—हाटे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की मोबाईल टावर कंपनीने नगर पालिकेकडे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता एकुण शुल्क रु. 50,000/— भरले असून त्याची पावती देण्यात आलेली आहे. सदरचे ना हरकत प्रमाणपत्र आमच्या कार्यालयात सादर करण्याकरीता तीन महिन्याची मुदत देण्यात आलेली होती. त्या मुदतीमध्ये ना हरकत प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे दि. 19.9. 2010 ला टाटा इंडीकॉम या कंपनीचा मोबाईल टावरचा तात्पुरता विज पुरवठा खंडीत करण्यात आलेला आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा समोर सांगितले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की नगर पालिकेचे ना हरकत प्रमाणपत्र असल्याशिवाय विज पुरवठा करता येत नाही असे विज वितरण कंपनीच्या विज पुरवठयाच्या अटी व शर्तीमध्ये नमुद केलेले आहे.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहिती अर्जात मागितलेली माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 27.1.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली दिसते. मात्र टाटा इंडीकॉम कंपनीच्या मोबाईल टावरला दिलेला विद्युत पुरवठा योग्य आहे अगर कसे याबाबत अपीलकर्त्याने सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2004-2006

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 511 नाग/2011**

श्री व्यंकट आसाराम मडावी(गोंड)
मु. पिंडकेपार पो. पाथरी
ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक
गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
आमगाव
ता. आमगाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, आमगाव तर्फे श्री व्ही. आर. पाटील पोलीस उपनिरीक्षक हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक गोंदिया तर्फे श्री एम. एस. बनसोडे पोलीस उपनिरीक्षक हे उपस्थित आहेत.

4. जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे उपस्थित असलेले पोलीस उपनिरीक्षक श्री पाटील यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24.1.2011 आणि दि. 25. 1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 27.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने दि. 31.12.2010 रोजी आणि दि. 11.1.2011 रोजी त्यांना जातीवाचक शिवीगाळ केल्याबद्यल व जिवंत मारण्याची धमकी दिल्याबद्यल तक्रार दिली होती. त्या तक्रारीच्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची आणि त्याबाबतच्या रिपोर्टची माहिती त्यांनी मागितलेली होती.

5. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही पोलीस स्टेशन गोरेगाव यांच्याशी संबंधीत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. 3.9.2011 रोजी पोलीस

स्टेशन गोरेगाव याना पत्र लिहून त्यांचेकडून माहिती मागविली ती माहिती पोलीस स्टेशन गोरेगाव कडून दि. 18.2.2011 रोजी प्राप्त झाली आणि त्याच दिवशी म्हणजे दि. 18.2.2011 रोजी अपीलकर्त्यास त्यांना दिलेल्या तक्रार अर्जाच्या संदर्भातील चौकशी अहवालाची प्रत आणि त्यासोबतच्या बयाणाच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याबद्यल त्याची पोच जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविली.

5. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने अप्पर पोलीस अधिक्षक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि सुनावणी नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीला अनुसरुन दि. 18.2.2011 रोजी माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे प्रथम अपील निकाली काढलेले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे उपस्थित असलेले श्री बनसोडे पोलीस उपनिरीक्षक यांनी आयोगापुढे सांगितले.

6. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 24.1.2011 आणि दि. 25.1.2011 चा माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2008-2009

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 513 नाग/2011

श्री अशोक किसनराव कोंडावार
7 मिलींद सोसायटी, नरेंद्र नगर नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री कुमरे
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
माध्यमिक शिक्षण विभाग चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री जयप्रकाश गुंडेराव गाडगिलवार सहा. शिक्षक सर्वोदय विद्यालय सास्ती हे मुख्यालयी राहात नसल्याबाबत त्यांनी दि. 12.11.2010 रोजी तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व टिपणीची प्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून टिपणीची प्रत मिळाली परंतू केलेल्या कार्यवाहीच्या अहवालाची प्रत त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग चंद्रपूर सौ. कुमरे हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद चंद्रपूर यांच्या वतीने अधिक्षक श्री रविंद्र दिघोळे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी सौ. कुमरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 17.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 22.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात श्री जयप्रकाश गुंडेराव गाडगिलवार सहा. शिक्षक सर्वोदय विद्यालय सास्ती हे मुख्यालयी राहात नसल्याबाबत तक्रार दिलेली होती. आणि त्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मुख्याध्यापक सर्वोदय विद्यालय सास्ती ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे माहितीच्या अर्जाच्या पूर्वीच त्यांनी दि. 15.11.2010 च्या पत्राने अपीलकर्त्याचा तक्रार अर्ज मुख्याध्यापक यांच्याकडे पाठविला आणि अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याच्या सुचना देवून कोणती कार्यवाही केली त्याबाबतचा अहवाल त्यांच्याकडून मागविला आणि त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास पाठविली. अशा प्रकारची कार्यवाही त्यांनी केलेली आहे आणि त्याबाबतची माहिती अपीलकर्त्यास दि. 3.12.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली.

5. त्यानंतर अपीलकर्त्याचे त्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जावर मुख्याध्यापकानी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला होता. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुख्याध्यापकाकडून खुलासा प्राप्त करुन उपलब्ध करुन द्यावा व त्यासोबत टिपणीची प्रत देखील द्यावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला असे श्री दिघोळे यांनी आयोगापुढे सांगितले.

6. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. 10.3.201 च्या पत्राने अपीलकर्त्यास आणि प्रथम अपीलाच्या निर्णया सोबत मुख्याध्यापकाच्या खुलाशाची प्रत आणि कार्यालयाच्या टिपणीची प्रत अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र टिपणीची प्रत सोबत मुख्याध्यापकाच्या खुलाशाची प्रत त्यांना प्राप्त झालेली नाही असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापकाकडून आलेल्या खुलाशाची प्रत अपीलकर्त्यास आयोगा समोर उपलब्ध करुन दिली. सदरची प्रत अपीलकर्त्याने स्वीकृत केली.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या

कार्यालयातील टिपणीची प्रत आणि अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जावर मुख्याध्यापकानी दिलेल्या खुलाशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2011-2013

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 514 नाग/2011**

श्री अमर ताराचंदजी तिरपुडे
C/o. केंद्रीय कार्यालय–जनसेवा जयलक्ष अन्याय,
भ्रष्टाचार निराकरण समिती
न्यू आशिर्वाद नगर गिरोला(कारधा)
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. सी. सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
भूमी अभिलेख नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री बी. जी. बांबळे
जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 14.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.1.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा रामटेक हद्दी मधील शिट क्र. 20 न.भु.क्र.2496 मोजनी मामला क्र. 62/09 संदर्भात त्याचप्रमाणे मारोती हिरालाल लारोळकर यांच्या आबादी प्लॉटच्या संदर्भात आणि जमीन मोजणीबाबत 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि अपीलकर्ता हे दारीद्रय रेषे खालील असल्याने त्यांना सदरची माहिती ही विनामुल्य मिळणे आवश्यक होते मात्र त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 11.1.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क रु. 166/– भरण्याबाबत कळविले. मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विनामुल्य माहिती दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस त्यांना उशिरा प्राप्त झाल्यामुळे ते प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहू शकले नाही व त्यांना विनामुल्य माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय रामटेक श्री बी. जी. बांबळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर श्री एस. सी. सुर्यवंशी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री बांबळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 31.1.201 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु. 166/— भरण्याबाबत कळविले होते. मात्र अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केले नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसत नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात शुल्क भरुन घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले होते. तथापी अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्कचा भरणा केला नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी श्री सुर्यवंशी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने दारीद्रय रेषे खालील असल्याबाबतचे प्रमाणपत्र अपील अर्जाला जोडलेले नव्हते तसेच अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे दारीद्रय रेषे खालील आहे ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली नाही म्हणून माहितीचे शुल्क भरुन घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचा निर्णय त्यांनी प्रथम अपीलात दिला.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहिती अर्जासोबत दारीद्रय रेषे खालील त्यांचा दाखला जोडलेला आहे. म्हणून दारीद्रय रेषे खालील दाखल्याची खात्री करुन घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी दारीद्रय रेषे खालील दाखल्याची खात्री करुन अपीलकर्त्यास माहिती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2011-2012

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 520 नाग/2011**

श्री ओंकार विठोबाजी काटोले
203 जवाहर नगर मार्ग क्र.3 मानेवाडा रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सोमेश्वर नैताम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री रामटेके
जन माहिती अधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 3.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन समान वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती झाली असल्याने वेतन निश्चिती सुधारीत होत नसल्याबद्यल शासकीय परीपत्रके पुरविण्याबाबत माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 8.12.2010 रोजी शासन निर्णय दि. 23 मार्च 2004 ची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली. सदरच्या शासन निर्णयात वरीष्ठ वेतनश्रेणी प्राप्त झालेल्या प्राथमिक शिखकांना मुख्याध्यापक पदी पदोन्नती देतांना एक काल्पनिक वेतनवाढ देवून वेतननिश्चिती करण्याबाबत हा शासन निर्णय आहे. या शासन निर्णया प्रमाणे त्यांची वेतननिश्चिती होणे आवश्यक आहे. परंतू त्यांची त्याप्रमाणे वेतननिश्चिती झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलामध्ये असा निर्णय दिला की अपीलकर्त्याचे वेतननिश्चितीच्या प्रस्तावाबाबत वित्त विभाग यांचा अभिप्राय घेण्यात यावा. त्याप्रमाणे वित्त विभाग यांचा अभिप्राय मागविण्यात आला. मात्र त्यांची दि. 23 मार्च 2004 चा शासन निर्णया प्रमाणे वेतननिश्चिती झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी श्री रामटेके हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री नैताम हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री रामटेके यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 3.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 25.11.2010 ला प्राप्त झाला. अपीलकर्त्याने समान वेतनश्रेणी मध्ये पदोन्नती झाली असल्याने वेतनाबाबत सुधारीतशासकीय परीपत्रके मागितलेले होते. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 8.12.2010 रोजी

शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई यांच्याकडील दि. 23 मार्च 2004 च्या शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. सदरच्या शासन निर्णयाची प्रत प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र त्या शासन निर्णयाप्रमाणे त्यांची वेतननिश्चिती करण्यात आली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री नैताम यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि सुनावणीमध्ये अपीलकर्त्यास समान वेतनश्रेणी मध्ये वेतननिश्चिती करण्याबाबतचा प्रस्तावा संदर्भात वित्त विभागाचा अभिप्राय घ्यावा असे ठरले त्यानुसार अपीलकर्त्याच्या वेतननिश्चितीचा प्रस्ताव वित्त विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे अभिप्रायासाठी पाठविला. त्याला अनुसरुन वित्त विभागाने दि. 14.7.2011 च्या पत्राने असा अभिप्राय दिला की अपीलकर्ता श्री ओंकार विठोबाजी काटोले सेवानिवृत्त उच्चश्रेणी मुख्याध्यापक यांना महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 मधील नियम 11 मधील टीप 1 नुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची धारणा पक्की करण्यात येत आहे असे वित्त विभागाने शिक्षणाधिकारी यांच्याकडे कळविले. वित्त विभागाच्या या अभिप्रायाची प्रत अपीलकर्त्यास सुनावणीच्या वेळी शिक्षणाधिकारी यांना उपलब्ध करुन दिली. सदरची प्रत अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जात मागितलेल्या वेतननिश्चितीच्या संदर्भात आवश्यक त्या शासन निर्णयाची प्रत तसेच वित्त विभागाच्या अभिप्रायाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2014-2015

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 522 नाग/2011**

श्री राकेश सुकरामजी महेशकर
जोशीवाडी, प्लॉट नं.35 नागपूर
ता. जि. नागपूर – 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक(लोहमार्ग)
नागपूर
रेल्वे पोलीस मुख्यालय, वंजारी नगर,
अजनी नागपूर 27
2) श्री वाय. के. चौधरी पोलीस उपअधिक्षक
जन माहिती अधिकारी
पोलीस अधिक्षक(लोहमार्ग) कार्यालय नागपूर
रेल्वे पोलीस मुख्यालय, वंजारी नगर,
अजनी नागपूर 27 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस अधिक्षक(लोहमार्ग) कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2006 ते 2007 मध्ये श्वान पथक लोहमार्ग नागपूरची स्थापना झाल्यानंतर श्वान पथकात नेमलेल्या कर्मचा–याबाबत 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 20.1.2011 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहिती मध्ये मुद्या क्र.3 च्या संदर्भात श्री एकनाथ राठोड यांची पोलीस हवालदार या पादावर नेमणूक कुठल्या शासकीय परीपत्रकानुसार करण्यात आली याची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस अधिक्षक(लोहमार्ग) नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक श्री वाय. के. चौधरी हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक(लोहमार्ग) नागपूर यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले होते.

4. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक श्री वाय. के. चौधरी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 20.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 20.1.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र पोलीस हवालदार श्री एकनाथ राठोड यांना श्वान पथकात नेमणूक कोणत्या शासकीय परीपत्रकानुसार दिली त्याची माहिती त्यांना

उपलब्ध झाली नाही. त्याबाबत जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक श्री चौधरी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की कर्मचा–यांना नियुक्ती देण्याचे अधिकार हे पोलीस अधिक्षक(लोहमार्ग) नागपूर यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार कर्मचा–यांची नेमणूक ते करीत असतात. त्याला अनुसरुन श्री एकनाथ राठोड यांची नेमणूक श्वान पथकात नेमणूक केलेली आहे असे जन माहिती अधिकारी श्री चौधरी यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास दि. 20.1.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी श्री एकनाथ राठोड यांची श्वान पथकात झालेल्या नेमणूकीची वर नमुद केल्याप्रमाणे वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळवावे की श्री एकनाथ राठोड यांची श्वान पथकात दिलेली नेमणूक ही पोलीस अधिक्षक(लोहमार्ग) नागपूर यांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार करण्यात आलेली आहे असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

2) प्रस्तूत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्यावर सुनावणी निर्णय घेणे अपेक्षित होते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी या पदाचा पदभार देखील जन माहिती अधिकारी यांचेकडे होता असे दिसून येते. तथापी भविष्यात प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्याची सुनावणी घेवून निर्णय देण्यात यावा अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2017-2018

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 533 नाग/2011**

श्री राजेश नवलकिशोर ठाकूर
विशाखा निवास, अजय नगर,
अंबाझरी हिल टॉप नागपूर
ता. जि. नागपूर – 440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री म. वि. पोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा संचालक(श्री प्रमोद निघोट)
स्वस्त धान्य दुकानधारक, मोहगांव(झिल्पी)
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. भगत आणि उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. भगत हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की दि. 25.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संचालक(श्री प्रमोद निघोट) स्वस्त धान्य दुकानधारक, मोहगांव(झिल्पी) ता. हिंगणा जि. नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 1.1.2010 पासून ते दि. 25.11.2010पर्यंत राशन ग्राहकांना पुरवठा करण्यात आलेल्या सर्व सामग्रीची माहिती म्हणजे गहू, तांदूळ, साखर, ज्वारी, तेल, दाळ इत्यादी वाटप केल्याची माहिती आणि ग्राहकाकडून विक्रीपोटी दिलेल्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या होत्या. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी तथा संचालक(श्री प्रमोद निघोट) स्वस्त धान्य दुकानधारक, मोहगांव यांचेकडून 30 दिवसात माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसिलदार हिंगणा यांचेकडे दाखल केले. तहसिलदार हिंगणा यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.2.11 रोजी दिला. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्काची रक्कम जमा केल्यानंतर 7 दिवसात संचालक स्वस्त धान्य दुकानधारक यांनी अपीलकत्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी 30 दिवसात त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांना सदरची माहिती विनामुल्य देणे आता क्रमप्राप्त आहे असे वकीलांनी आयोगा पुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा संचालक श्री प्रमोद निघोट स्वस्त धान्य दुकानधारक, श्री प्रमोद निघोट हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा श्री पोटे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री प्रमोद निघोट स्वस्त धान्य दुकानधारक यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अंतर्गत जन माहिती अधिकारी म्हणून त्यांना घोषित करण्यात आले नाही. त्यावर तहसिलदार हिंगणा यांनी आयोगा पुढे असे सांगितले की स्वस्त धान्य दुकानदार जन माहिती अधिकारी म्हणून घोषित केलेले नाही. म्हणून अपीलकर्त्याने माहिती ही तहसिलदार तहसिल कार्यालय हिंगणा यांचेकडे मागणे योग्य झाले असते. मात्र त्यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले. आणि प्रथम अपीलाचा निर्णय त्यांनी दि. 2.2.2011 रोजी दिला. आणि त्यामध्ये अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे आदेश प्रथम अपीलात दिले असे त्यांनी आयोगा पुढे सांगितले.

6. अपीलकर्ता यांचे वकील आणि तहसिलदार हिंगणा यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की स्वस्त धान्य दुकानाचे जे संचालक आहेत ते जन माहिती अधिकारी म्हणूनघोषित झाले नाही. म्हणून स्वस्त धान्य दुकानाच्या संदर्भात माहिती देण्याची जबाबदारी ही तहसिलदार हिंगणा यांच्या कार्यालयाची आहे. ही बाब लक्षात घेता प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्यास तहसिलदार हिंगणा यांनी मोहगांव (झिल्पी) या गावातील स्वस्त धान्य दुकानाची माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेवून माहिती देण्यास विलंब झाल्याने ते आता विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत तहसिलदार हिंगणा यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जातील माहिती संबंधीत स्वस्त धान्य दुकानदाराकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2018-2019

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 534 नाग/2011**

श्री राजेश नवलकिशोर ठाकूर
विशाखा निवास, अजय नगर,
अंबाझरी हिल टॉप नागपूर
ता. जि. नागपूर – 440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री म. वि. पोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन हिंगणा तालुक्यातील सर्व अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात आपल्या कार्यालयाकडून अर्जदार व गैरअर्जदारावर केलेल्या दंडात्मक कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. आणि सदरची माहिती दि. 1.1.2009 ते 24.12.2010 या कालावधीची त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र सदरच्या माहिती मध्ये दंड वसुलीची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे नामंजुर केल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा श्री पोटे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास दि. 1.1.2009 ते 24.12.2010 या कालावधीची हिंगणा तालुक्यातील सर्व अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणात केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. म्हणून सदरची माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास माहिती तयार झाल्यानंतर दि. 24.1.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांना दंडाच्या वसुलीची माहिती प्राप्त झाली नाही. त्यावर तहसिलदार

हिंगणा यांनी असे सांगितले की अपीलकर्त्यास दि. 24.1.2011 च्या पत्राने जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामध्ये दंड वसुलीच्या माहितीचा देखील समावेश आहे त्यामुळे स्वतेत्र दंड वसुलीची माहिती दिलेली नाही आणि त्याबाबत अपीलकर्त्याची खात्री करुन देण्यात आली. तसेच दंडाची रक्कम का भरली नाही याचे कोणतेही कारण त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयात कळविल्याचे तहसिलदार हिंगणा त्यांनी सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 24.1.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2021-2022

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 535 नाग/2011**

श्री राजेश नवलकिशोर ठाकूर
विशाखा निवास, अजय नगर,
अंबाझरी हिल टॉप नागपूर
ता. जि. नागपूर – 440033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अशोक बाबुरावजी उमरेडकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती कार्यालय हिंगणा
ता. जि. नागपूर
2) श्री रामराव नत्थुजी मदनकर
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा वडगाव(गुजर)
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 16.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 29.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा वडगाव(गुजर) ता. हिंगणा जि. नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन शाळे विषयी 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडून आवश्यक माहिती प्राप्त झाली असल्यामुळे आणि माहिती मिळाल्याबाबत त्यांचे समाधान झाल्यामुळे प्रस्तूत प्रकरणात त्यांचे आता काहीही म्हणणे नाही म्हणून अपील खारीज करण्यात यावे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले म्हणून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2024-2025

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 537 नाग/2011**

श्री मोहम्मद शाकीर मेहमुद भाई तुरक
चव्हाण कवेलु कारखान्याच्या मागे,
फुटक्या किल्ल्याजवळ, जलनगर वार्ड चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर –442402 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अरुण गावंडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर
2) श्री दिपक कारंडे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय कळमेश्वर
ता. कळमेश्वर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 18.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 1.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय कळमेश्वर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांची शेत जमीन सर्व्हे क्र. 209/1 चा 7/12 फेरफार क्र. 262/2007 दि. 25.11. 2007 या नोंद फेरफाराच्या निकालाच्या संदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत त्यांनी दिली होती. त्यावर फेरफार संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती तथापि त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी सावनेर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय देण्यात आला नाही आणि कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कळमेश्वर श्री कारंडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सावनेर श्री अरुण गावंडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तहसिलदार कळमेश्वर श्री कारंडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 1.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मात्र अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी दि. 18.1.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविल्याचे सुनावणीत नमुद केले.

त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी सावनेर यांचेकडे दाखल केले. मात्र या प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी हे तहसिलदार कळमेश्वर असल्याने उपविभागीय अधिकारी सावनेर यांनी प्रथम अपील तहसिलदार कळमेश्वर यांचेकडे दि. 10.2.2011 रोजी पाठविले असे श्री अरुण गावंडे उपविभागीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच तहसिलदार कळमेश्वर आणि उपविभागीय अधिकारी सावनेर यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की उपविभागीय अधिकारी यांनी प्रथम अपील तहसिलदार कळमेश्वर यांचेकडे निर्णयासाठी पाठविले होते. मात्र तत्कालीन तहसिलदार यांनी प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय दिलेला दिसून येत नाही. म्हणून प्रथमतः विद्यमान तहसिलदार यांनी या प्रथम अपीलाचा निर्णय घेणे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये आवश्यक आहे. म्हणून तहसिलदार कळमेश्वर यांना प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलाचा निर्णय घेणे आवश्यक आहे म्हणून प्रस्तूत प्रकरण पुनर्विचारार्थ तहसिलदार यांचेकडे पाठविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाच्या मुदतीत तहसिलदार कळमेश्वर यांनी अपीलकर्त्याच्या प्रथम अपीलाच्या कागदपत्रांची छाननी व तपासणी करुन यांग्य तो निर्णय घ्यावा आणि घेतलेल्या निर्णयाची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) तत्कालीन तहसिलदार यांनी प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय घेलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीत त्यांना देण्यात येत असून भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत विद्यमान तहसिलदार यांनी तत्कालीन तहसिलदार यांचेकडे पाठवावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2027-2028

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 536 नाग/2011**

श्री जितेन्द्र छोटेलाल चौधरी
4, रामसुद्यीन ले–आऊट गोरेवाडा रोड नागपूर
ता. जि. नागपूर –13 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक
महा. राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. मुंबई
प्रकाशगंगा, वांद्रे(पूर्व) मुंबई 51
2) जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक
महा. राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. मुंबई
प्रकाशगंगा, वांद्रे(पूर्व) मुंबई 51 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 18.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 23.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक महा. राज्य विद्युत पारेषण कंपनी लि. मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन प्रशासकीय परीपत्रक क्र. 317 दि. 9. 11.2010 नुसार ( ) मार्क केलेल्या विषया अंतर्गत जी.आर.ची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 7.7.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण विचारणा केलेली माहिती महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मुंबई यांचे प्रशासकीय परीपत्रक क्र. 317 दि. 9.11.2010 ला अनुसरुन आहे. तरी सदरची माहिती महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मुंबई यांच्या माहिती अधिका–याकडून उपलब्ध करुन घ्यावी. तथापि त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेवून कोणताही निर्णय त्यांना मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांच्या वतीने श्री मंगेश मधुकर शिंदे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने देखील त्यांनाच प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री मंगेश शिंदे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 23.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 7.1.2011 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मुंबई यांचेशी संबंधीत असल्याने अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 7.7.2011 च्या पत्राने असे कळविले की सदरची माहिती महा. राज्य विद्युत वितरण कंपनी मुंबई यांचेकडून सदरचे परीपत्रक क्र. 317 दि. 9.11.2010 प्राप्त करुन घ्यावे. कारण हे परीपत्रक विद्युत वितरण कंपनीने काढलेले आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे की त्यांची आई सफाई

कामगार म्हणून पारेषण कंपनीमध्ये कामावर आहे. सफाई कामगारांच्या वारसांना त्यांच्या जागी नेमणूक मिळण्याच्या संदर्भात त्यांना परीपत्रकाची प्रत पाहिजे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री मंगेश शिंदे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की ज्याप्रमाणे विद्युत वितरण कंपनीने सफाई कामगारांच्या वारसांना नोकरी संदर्भात परीपत्रक काढलेले आहे त्याच धरतीवर विद्युत पारेषण कंपनीने देखील परीपत्रक क्र. 261 दि. 29.3.2011 रोजी काढलेले आहे. त्यामध्ये सफाई कामगारांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबतची कार्यवाही नमुद केलेली आहे. मात्र अपीलकर्त्याने पारेषण कंपनीच्या या परीपत्रकाची प्रत मागितली नव्हती. त्यांनी विद्युत वितरण कंपनीच्या परीपत्रकाची प्रत अर्जात नमुद केलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास पारेषण कंपनीने काढलेल्या परीपत्रकाची प्रत देखील त्यांनी उपलब्ध करुन देण्याची आयोगासमोर तयारी दर्शविली. आणि त्यांनी सदरची प्रत अपीलकर्त्यास आयोगासमोर उपलब्ध करुन दिली. सदरची प्रत अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले.

5. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याने त्या परीपत्रकाच्या आधारे त्यांच्या नोकरीच्या संदर्भात योग्य त्या प्राधिकरणाकडे अर्ज करणे संयुक्तिक होईल. तथापी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2030-2031

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 538 नाग/2011**

श्री प्रकाश दगडू भारंबे
C/o. किशोर मुंजनकर, 7–ए, साटोने ले–आऊट
गिताई नगर धुनिवाले मठासमोर, नागपूर रोड वर्धा
ता. जि. वर्धा –442401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव (पदुम)
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) श्री सु. प. सोवितकर अवर सचिव कृषी व पदुम
जन माहिती अधिकारी तथा सचिव
पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विकास विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 18.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री सोवितकर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 17.1.2011 रोजी प्राप्त झाला. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने महाराष्ट्र शासनाच्या दुग्धव्यवसाय विकास विभागातील महाव्यवस्थापक पदाच्या सेवा प्रवेश नियमातील नियम कमांक 12 नुसार अनुसुचित जाती जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबत अनुभवाची अट शिथिल करण्याचे अधिकार महाराष्ट्र लोकसेवा आयोगास आहेत. तर नियुक्त केलेल्या कोणकोणत्या उमेदवारांच्या कोणत्या व कीती अनुभवाची अट शिथिल केली असल्याबाबत आयोगाने शासनास कळविले आहे काय अशी माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 4.2.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास उत्तर पाठविलेले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील

उपसचिव यांचेकडे दाखल केले होते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांनी अपीलकर्त्यास त्यापूर्वीच दि. 12.1.2011 च्या पत्राने प्रस्तूत माहिती संदर्भात वस्तुस्थिती कळविलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

4. जन माहिती अधिकारीयांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 13.1.2011 च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 4.2.2011 च्या पत्राने उत्तर पाठविलेले आहे. अपीलकर्त्याने महाव्यवस्थापक पदाच्या भरतीच्या संदर्भात अट शिथिल करण्याबाबत आयोगाने शासनास कोणत्याही प्रकारची माहिती पाठविलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रस्तूत प्रकरणी सदरची माहिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्पष्टपणे असे कळवावे की महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाव्यवस्थापक पदावर नेमणूकीची शिफारस करतांना कोणत्या उमेदवाराना अनुभवाची अट शिथिल केलेली आहे हे आयोगाने शासनास कळविलेले नाही असे स्पष्टपणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2033-2034

जा.क्र.——————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 547 नाग/2011**

श्री मुरलीधर बंडुजी रायपुरे
मु. पो. केळझर
ता. मुल जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री वरुण सहारे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 19.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 28.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 14.6.2010 रोजी फेरफार संबंधी अर्ज केला होता. त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 11.1.2011 च्या पत्राने असे कळविले की आपला अर्ज हा चिचपल्ली सर्कल मध्ये कार्यवाही करीता प्राप्त झालेला नाही त्यामुळे संबंधीत अर्जावर कार्यवाही करता आली नाही त्याचप्रमाणे आपल्या माहितीच्या अर्जात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात निश्चित बोध होत नाही म्हणून आपण जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविले होते. त्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला परंतू त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर श्री सहारे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने देखील त्यांनाच प्राधिकृत केलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर श्री सहारे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 28.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 3.1.2010 रोजी प्राप्त झाला होता. तथापी अर्जदाराने सादर केलेल्या अर्जावरुन मागणी केलेल्या माहितीचा बोध होत नसल्याने स्वतः संपर्क साधून आवश्यक ती माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी दि. 11.1.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविले होते. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. परंतू अपीलकर्त्याने

तहसिलदार कार्यालयाशी संपर्क साधला नाही म्हणून प्रस्तूत प्रकरणात अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीचा कोणताही बोध होवू शकला नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतू अपीलकर्ता त्या सुनावणीस गैरहजर राहिले. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती पुरविलेली असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याचे प्रथम अपील खारीज केलेले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 14.6.2010 च्या मुळ अर्जाच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी तहसिलदार चंद्रपूर कार्यालयाकडे दि. 29.7.2011 रोजी उपस्थित राहून त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात तहसिलदार यांचेशी चर्चा करावी आणि आवश्यक ती कागदपत्रे त्यांचेकडे सादर करावी आणि त्यानंतर तहसिलदार चंद्रपूर यांनी प्रस्तूत प्रकरणात योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांनी दि. 29.7.2011 रोजी तहसिलदार चंद्रपूर यांच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत हजर राहावे आणि त्यांच्याकडील दि. 14.6.2010 च्या अर्जाच्या संदर्भात चर्चा करावी आणि त्या चर्चे नंतर आवश्यक ती कागदपत्रे तहसिलदार यांचेकडे दाखल करावी आणि अपीलकर्त्याने तहसिलदार यांचेकडे आवश्यक ती कागदपत्रे दाखल केल्यानंतर त्या प्रकरणावर नियमाप्रमाणे 30 दिवसाच्या मुदतीत कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास कळवावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2036-2037

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 544 नाग/2011**

श्री शेख करिम वल्द शेख गफुर
लोहार पुरा भाटापरा बिल्डींग, मस्जिद के पास, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अशोक भिमराव पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
नागपूर महानगर पालिका, गांधीबाग झोन क्र.6, नागपूर
गांधीबाग नागपूर
2) श्री अरुण बी. मोगरकर
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता(लोककर्म विभाग)
नागपूर महानगर पालिका, गांधीबाग झोन क्र.6, नागपूर
गांधीबाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 19.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. एस.बी.त्रीवेदी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 22.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता(लोककर्म विभाग) नागपूर महानगर पालिका, गांधीबाग झोन क्र.6, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 8.10.2010 रोजी लोहार पुरा भाटापरा बिल्डींग, मस्जिद जवळ रोड वर खाली जागेवर बांधकाम करुन आणि अतिक्रमण करुन ताज बिल्डींग आणि मटेरीयल व्यवसाय करीत आहे. त्याबाबत तक्रार अर्ज दिला होता. त्यावर केलेली कार्यवाही त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 8.12.2010 ला माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त नागपूर महानगर पालिका, गांधीबाग झोन क्र.6, नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिला आणि त्यामध्ये असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी संबंधिताला पाठविलेल्या नोटिसीची प्रत अपीलार्थीस द्यावी. तथापि त्यांना नोटिसीची प्रत मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता श्री अरुण बी. मोगरकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त श्री अशोक भिमराव पाटील हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री मोगरकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे दि. 22.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 18.12.2010 च्या पत्राने माहिती

उपलब्ध करुन दिली. आणि त्यामध्ये असे नमुद केले की मे. ताज बिल्डींग ॲन्ड मटेरीअल रा. लोहारपूरा मस्जिद समोर वार्ड क्र. 69 भालदारपूरा नागपूर यांना जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे व बांधकामाच्या मंजूर नकाशाची प्रत सादर करण्याबाबत लोककर्म विभागा तर्फे दि. 29.11. 2010 ला पत्र देण्यात आलेले आहे अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सहाय्यक आयुक्त नागपूर महानगर पालिका, गांधीबाग झोन क्र.6, नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 14.1.2011 ला घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी संबंधिताला पाठविलेल्या नोटिसीची कोणतीही प्रत मिळाली नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी 7 दिवसाचे आंत नोटिसीची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला असे सहाय्यक आयुक्त श्री अशोक पाटील यांनी आयोगा पुढे सांगितले. या प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.12.2010 च्या पत्राने पाठविलेल्या नोटिसीची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापी सदरच्या नोटिसीची प्रत अपीलकर्त्यास प्राप्त झाली नाही असे अपीलकर्ता यांच्या वकीलानी आयोगा पुढे सांगितले. सदरच्या नोटिसीची प्रत पुन्हा आयोगा समोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. ती प्रत अपीलकर्ता यांच्या वकीलानी स्वीकृत केली. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2039-2040

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 554 नाग/2011**

श्री भिमराव भेमटु टेंभुर्णे
विदर्भ हाऊसिंग कॉलनी,
C/o. हनुमान मंदिराच्या मागे, जि.प. चौक भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक
आरोग्य सेवा, नागपूर मंडळ नागपूर
माताकचेरी, दिक्षाभूमी जवळ, नागपूर
2) श्री नामदेव मनोहर ठाकरे
जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी,
आरोग्य सेवा, नागपूर मंडळ नागपूर
माताकचेरी, दिक्षाभूमी जवळ, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2010 मध्ये 12 कर्मचा–यांना सहा. अधिक्षकाची पदोन्नती दिली त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत त्यांनी मागितलेली होती. तसेच रोस्टरची प्रत मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 12 कर्मचा–यांपैकी 2 कर्मचा–यांची जात वैधता प्रमाणपत्राची प्रत मिळाली. मात्र 10 कर्मचा–यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची प्रत मिळाली नाही. तसेच रोस्टरची प्रत त्यांना मिळाली. मात्र सदरची प्रत ही सांक्षांकीत नसल्यामुळे अधिकृत नाही म्हणून त्यांना रोस्टरची अधिकृत प्रत मिळणे आवश्यक असे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री नामदेव मनोहर ठाकरे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 27.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 7.2. 2011 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र 12 कर्मचा–यांपैकी 2 कर्मचा–यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती त्यांना मिळाल्या आणि दि. 31.12.2010 ला भरलेली व रीक्त पदाची माहिती त्यांना मिळाली. मात्र रोस्टरची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की एकुण 12

कर्मचा–यांना सहा. अधिक्षक पदावर पदोन्नती दिलेली आहे त्यापैकी दोनच कर्मचा–यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध होत्या. 10 कर्मचा–यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. तसेच त्या कर्मचा–यांना खुल्या प्रवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. तसेच अपीलकर्त्यास S.C., S.T., N.T., S.B.C., O.B.C. व खुल्या प्रवर्ग पदाच्या संदर्भात भरलेली व रीक्त पदे यांची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास रोस्टरची सांक्षांकीत प्रत देखील उपलब्ध करुन देता येईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 7.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी 12 कर्मचा–यांपैकी 2 कर्मचा–यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती दिलेल्या आहेत. इतर 10 कर्मचा–यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविणे योग्य होईल तसेच अपीलकर्त्यास रोस्टरची अधिकृत प्रत प्रमाणीत करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे 10 कर्मचा–यांच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे विनामुल्य कळवावे तसेच रोस्टरची अधिकृत प्रत साक्षांकीत करुन अपीलकर्त्यास विनामुल्य 7 दिवसात उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2039-2040

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 552 नाग/2011**

श्री सुकुमार नटराज बेलेकर
लष्करीबाग, सर्कल नं.15/21, कमाल चौक नागपूर
ता. जि. नागपूर – 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिलीप सावरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री निशिकांत सुके
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. रामटेके हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 4.10.2010 रोजी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे केलेल्या तक्रार अर्जावर काय कार्यवाही केली त्याची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केले. त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तसेच उपविभागीय अधिकारी आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी हे उपस्थित होते. उपविभागीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 21.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध त्यांच्या कार्यालयात घेण्यात आला तथापी अपीलकर्त्यास दि. 4.10.2010 चे जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडून पाठविलेला अर्ज त्यांच्या कार्यालयास उपलब्ध नाही. म्हणून अपीलकर्त्यास त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या आत दि. 18.1.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कागदपत्राचा शोध घेतला असता ते उपलब्ध झाले नसल्याने आपणास माहिती सद्या पुरविता येत नाही. तथापी आपण सदर कागदपत्राच्या प्रती पुरविल्यास त्यावर तातडीने कार्यवाही करुन अवगत करण्यात येईल असे अपीलकत्यास कळविले. मात्र त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली

प्रथम अपीलाचा निर्णय दि. 10.2.2011 रोजी निर्गमीत करण्यात आला. आणि त्यामध्ये अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्यावर अपीलकर्ता यांनी राजस्व शाखेतून पाठपुरावा करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला. त्याला अनुसरुन उपविभागीय अधिकारी यांनी पुन्हा जिल्हाधिकारी नागपूर यांच्या कार्यालयाकडे अपीलकर्त्याच्या दि. 4.10.2010 च्या अर्जाचा शोध घेतला. तथापी जिल्हाधिकारी नागपूर यांच्या कार्यालयाकडे देखील अपीलकर्त्याचा दि. 4.10.2010 चा अर्ज प्राप्त झाला नाही म्हणून अपीलकर्त्याने त्यांच्याकडील दि. 4.10.2010 च्या अर्जाची प्रत उपलब्ध करुन दिल्यास त्यावर नियमाप्रमाणे योग्य कार्यवाही करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे उपविभागीय अधिकारी यांनी आयोगा पुढे मान्य केले. त्याला अनुसरुन आज सुनावणीच्या वेळी आयोगा समोर अपीलार्थीच्या वकीलांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे दि. 4.10.2010 च्या अर्जाची प्रत उपलब्ध करुन दिली. त्यावर नियमाप्रमाणे 30 दिवसाच्या आत कार्यवाही करुन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत उपविभागीय अधिकारी नागपूर यांनी अपीलकर्त्याच्या दि. 4.10.2010 च्या अर्जावर योग्य ती चौकशी आणि कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2039-2040

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 555 नाग/2011**

श्री डॉ. योगानंद मारोतराव कावरे
प्लॉट नं. 1260 वैशाली नगर नागपूर
ता. जि. नागपूर – 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) डॉ. एन. एस. वानखेडे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी
जन माहिती अधिकारी
आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 31.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 5 व्या वेतन आयोगाची थकबाकी देणे संदर्भात तसेच सेवेचा कालावणी नियमित करण्या संदर्भात आणि वेतनवाढी संदर्भात 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि सुनावणी नंतर देखील त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. एन. एस. वानखेडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने प्रशासकीय अधिकारी श्री गेडाम हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी डॉ. वानखेडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 31.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 4.1.2011 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 24.1.2011 ला माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी माहितीचे शुल्क रु. 72/– भरण्याबाबत पत्र दिले त्यानुसार अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क रु. 72/– दि. 29.1.2011 रोजी भरणा केले आणि त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 3.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे दाखल

केले. प्रथम अपीलाच्या सुनावणी नंतर अपीलकर्त्यास दि. 4.3.2011 च्या पत्राने देयकाच्या विवरणाच्या 20 साक्षांकीत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन दिल्या. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की दिलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची आहे त्यामुळे त्या माहितीचा कोणताही स्पष्ट बोध होत नाही असे त्यांनी आयोगा पुढे सांगितले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करण्यात आले. त्यावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी 1 ते 7 मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती दिलेली आहे. तथापी त्यांच्या 5 व्या वेतन आयोगाची थकबाकी आणि वेतनवाढ मंजुरीचे थकबाकीचे संदर्भात द्यावयाच्या देयकाबाबत कोषागार नागपूर यांचेकडून या देयकांना विलंब झाल्यामुळे पूर्नलेखा तपासणी प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे नमुद केले. म्हणून अपीलकर्त्याचे सदरचे देयक पूर्नलेखा तपासणी प्रमाणपत्रासठी संचालक आरोग्य विभाग मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानंतर पुन्हा संचालकाना स्मरणपत्र पाठविलेले आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणात अपीलकर्त्याच्या देयकाना पुर्नतपासणी लेखा प्रमाणपत्र संचालकाकडून प्राप्त करण्यासाठी केलेल्या अद्यावत कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास थकबाकी देयकाचे संदर्भात वर नमुद केल्याप्रमाणे संचालक आरोग्य सेवा यांचेकडे पुर्नतपासणी लेखा प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिलेल्या स्मरणपत्राच्या प्रती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2043-2044

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 561 नाग/2011, अपील क्रमांक 562 नाग/2011 आणि अपील क्रमांक 563 नाग/2011.**

श्री राजेश नवलकिशोर ठाकूर
विशाखा निवास, अजय नगर,
अंबाझरी हिल टॉप, नागपूर
ता. जि. नागपूर – 440 033 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 561 नाग/2011</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री डी. डी. खडसे
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत मोंढा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 562 नाग/2011</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री जीवन शालीग्राम देशमुख
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत वडधामना
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 563 नाग/2011</u>**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) श्री डब्लु. एम. दामेधर
जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत वानाडोंगरी
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 21.7.2011 )

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये अपील क्रमांक 561 नाग/2011, अपील क्रमांक 562 नाग/2011 आणि अपील क्रमांक 563 नाग/2011 असे तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. या तीन्ही द्वितीय अपीलांमध्ये माहितीचा विषय हा एकच आहे. त्याचप्रमाणे अपीलकर्ता देखील एकच आहे. म्हणून या तीन्ही द्वितीय अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यासाठी अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 15.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. वर नमुद केल्याप्रमाणे तीन्ही द्वितीय अपीलांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली आणि खालीलप्रमाणे तीन्ही अपीलांचा निर्णय देण्यात आला.

3. **अपील क्रमांक 561 नाग/2011** – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.11.2010 चा माहितीचा अर्ज ग्रामपंचायत मोंढा कार्यालयाकडे माहिती मागण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात देण्यासाठी ते गेले असता ग्रामपंचायत कार्यालय मोंढा येथील कर्मचा–यानी सदरचा अर्ज स्विकारला नाही म्हणून त्यांनी सदरचा माहितीचा अर्ज पंचायत समिती कार्यालयाकडे सादर केला. आणि त्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्या बद्दलची माहिती, ग्रामसेवक व कर्मचारी यांचे वेतन, ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येणा–या सर्व योजनांची माहिती, आर्थिक योंजनांच्या ठरावाची प्रत, ग्रामपंचायत धोरण करण्याबाबत व्यवस्था इत्यादीची माहिती अपीलकर्ता यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना दि. 23.12.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की आपला दि. 25.11.2010 चा माहितीचा अर्ज दि. 3.12.2010 रोजी प्राप्त झाला. आपण मागितलेली माहिती सुस्पष्ट नसल्याने कोणती माहिती द्यावी याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. तरी आपण प्रत्यक्ष कार्यालयात येवून माहिती समजावून द्यावी जेणेकरुन माहिती आपणास देणे सोयीचे होईल असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या अर्जात मागितलेली माहिती ही सुस्पष्ट असल्याने ते देण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात गेले नाही. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत मोंढा श्री डी. डी. खडसे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा यांच्या वतीने श्री कुंभारे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 3.12.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने ग्रामपंचायत मोंढा विषयी माहिती मागितलेली होती. तथापी सदरच्या माहितीचा निश्चित बोध होत नसल्याने तसेच सदरची माहिती सुस्पष्ट नसल्याने कोणती माहिती द्यावी याबाबत संभ्रम निर्माण झाला. म्हणून त्यांनी अपीलकर्त्यास दि. 23.12.2010 रोजी पत्र पाठवून असे कळविले की आपण मागितलेली माहिती सुस्पष्ट नसल्याने प्रत्यक्ष कार्यालयात येवून माहिती समजावून द्यावी जेणेकरुन माहिती आपणास देणे सोयीचे होईल तथापी अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी ठेण्यात आली. त्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता हे गैरहजर होते. तथापी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुन त्यांना असे दिसून आले की मागणी केलेली माहिती ही स्पष्ट नसल्याचे दिसून येते त्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी यांना स्पष्ट माहिती मागावी व माहिती अधिकारी यांनी नियमाप्रमाणे शुल्क स्विकारुन अपीलकर्ता यांना 7 दिवसात माहिती द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने हजर असलेल्या त्यांच्या प्रतिनिधीनी आयोगापुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 25.11.2010 च्या माहितीच्या अर्जातील माहिती संबंधी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी अपीलकर्त्यास दि. 23.12. 2010 च्या पत्राने माहिती सुस्पष्ट नसल्याचे कळवून माहिती समजावून देण्यासाठी त्यांच्या कार्यालयात बोलाविले होते परंतू अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात त्यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले नाही.

7. तथापी अपीलकर्त्याच्या दि. 25.11.2010 च्या माहितीच्या अर्जात त्यांनी ग्रामपंचायत मोंढा विषयी माहिती मागितलेली दिसते. त्यामध्ये ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्या बद्यलची माहिती, ग्रामसेवक व कर्मचारी यांचे वेतन, ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येणा–या सर्व योजनांची माहिती, आर्थिक योंजनांच्या ठरावाची प्रत, ग्रामपंचायत धोरण करण्याबाबत व्यवस्था इत्यादी संदर्भात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

8. <u>अपील कमांक 562 नाग/2011</u> – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी सांगितले की त्यांना दि. 4.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत वडधामना यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन

ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्या बद्यलची माहिती, ग्रामसेवक व कर्मचारी यांचे वेतन, ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येणा—या सर्व योजनांची माहिती, आर्थिक योंजनांच्या ठरावाची प्रत, ग्रामपंचायत धोरण करण्याबाबत व्यवस्था इत्यादीची माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 3.1.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण मागणी केलेली ग्रामपंचायत संबंधातील माहिती विविध विषया संबंधी मागितलेली आहे. परंतू मागितलेली माहिती स्पष्ट नाही तसेच काही माहिती ग्रामपंचायतीशी संबंधीत नाही म्हणून ग्रामपंचायत संबंधातील स्पष्ट माहिती मागावी असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. मात्र अपीलकर्त्याचे प्रस्तूत प्रकरणी असे म्हणणे आहे की माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही स्पष्ट आहे त्यातील ज्या माहितीची माहिती ग्रामपंचायतीशी संबंधीत आहे ती माहिती त्यांना देण्यात यावी असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

9. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत वडधामना श्री जीवन देशमुख हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री प्रविण देशमुख हे उपस्थित होते.

10. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 4.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध होती. तसेच त्यांनी मागितलेल्या माहितीचा कोणताही बोध होत नव्हता. त्यांनी अपीलकर्त्यास दि. 3.1.2011 रोजी पत्र पाठवून आपण ग्रामपंचायतच्या सबंधात स्पष्ट माहिती मागावी म्हणजे माहिती देणे सोयीचे होईल असे अपीलकर्त्यास त्यांनी कळविले होते. अपीलकर्त्याने कोणताही स्पष्ट माहिती मागितली नव्हती म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापि त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतू अपीलकर्ता सदरच्या सुनावणीस गैरहजर राहिले. म्हणून जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेवून प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि त्या निर्णयामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्याच्या अर्जाची पाहाणी केली असता मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची आहे म्हणून अपीलकर्त्याने पाहिजे असलेली माहिती स्पष्ट मागावी व माहितीचे शुल्क भरुन माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

11. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास दि. 3.1. 2011 च्या पत्राने स्पष्ट माहिती मागावी असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध असल्याचे नमुद केलेले आहे.

अपीलकर्त्याच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्या बद्यलची माहिती, ग्रामसेवक व कर्मचारी यांचे वेतन, ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येणा–या सर्व योजनांची माहिती, आर्थिक योंजनांच्या ठरावाची प्रत, ग्रामपंचायत धोरण करण्याबाबत व्यवस्था इत्यादीची कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असेल ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

12. <u>अपील कमांक 563 नाग/2011</u> – आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी सांगितले की त्यांनी दि. 16.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत वानाडोंगरी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्या बद्यलची माहिती, ग्रामसेवक व कर्मचारी यांचे वेतन, ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येणा–या सर्व योजनांची माहिती, आर्थिक योंजनांच्या ठरावाची प्रत, ग्रामपंचायत धोरण करण्याबाबत व्यवस्था इत्यादीची माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

13. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत वानाडोंगरी श्री डब्लु. एम. दामेधर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा यांच्या वतीने श्री कुंभारे हे उपस्थित होते.

14. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री दामेधर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 16.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा योग्य खुलासा होत नव्हता म्हणून त्यांनी अपीलकर्त्यास दि. 24.11.2010 रोजी पोस्टाद्वारे पत्र पाठवून असे कळविले की आपल्या अर्जात नमुद केलेल्या माहितीचा योग्य खुलासा होत नाही म्हणून आपणास हव्या असलेल्या माहितीच्या संदर्भात प्रत्यक्ष भेटून माहिती बाबत खुलासा सादर करावा जेणेकरुन माहिती आपणास देणे सोयीचे होईल सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविल्याचे सांगितले. आणि त्याची प्रत प्रथम अपीलीय अधिकारी यांना देखील दिली होती. सदरची प्रत पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास मिळालेली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र सदरच्या पत्राची प्रत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पोस्टाद्वारे प्राप्त झाल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. यावरुन सदरचे पत्र पोस्टाद्वारे पाठविल्याचे दिसून येते. तथापी अपीलकता यांनी माहिती बाबत खुलासा केला नाही व त्यांच्या कार्यालयात ते हजर देखील झाले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

15. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती हिंगणा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 31.1.2011 ठेण्यात आली होती. परंतू अपीलकर्ता त्या सुनावणीस गैरहजर राहीले. मात्र जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुन घेवून प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची आहे. म्हणून अपीलकर्ता यांना जी माहिती हवी आहे त्याबाबत लेखी कळवावे व माहितीचे शुल्क भरुन 7 दिवसात जन माहिती अधिकारी यांनी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

16. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 16. 11.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी र्यास दि. 24.11. 2010 पत्राने आपण मागितलेली माहिती ही स्पष्ट नसल्याने आपणास पाहिजे असलेल्या बाबत स्पष्ट खुलासा द्यावा किंवा प्रत्यक्ष भेटून माहिती समजावून सांगावी जेणेकरुन माहिती आपणास देणे सोयीचे होईल असे पोस्टाने कळविलेले दिसून येते. तथापी अपीलकर्त्याचे माहिती अर्जाचे अवलोकन केले असता ग्रामपंचायत कार्यालयाची रचना, ग्रामसेवकाचे अधिकार व कर्तव्या बद्यलची माहिती, ग्रामसेवक व कर्मचारी यांचे वेतन, ग्रामपंचायत अंतर्गत राबविण्यात येणा–या सर्व योजनांची माहिती, आर्थिक योंजनांच्या ठरावाची प्रत, ग्रामपंचायत धोरण करण्याबाबत व्यवस्था इत्यादीची माहिती मागितलेली आहे. म्हणून अपीलकर्ता यांच्या माहिती अर्जातील मागितलेल्या माहिती पैकी जी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात ग्रामपंचायत कार्यालयाकडे उपलब्ध आहे ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) <u>**अपील कमांक 561 नाग/2011**</u> – अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाकडे जी माहिती उपलब्ध असेल ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) <u>**अपील कमांक 562 नाग/2011**</u> – अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

3) **<u>अपील क्रमांक 563 नाग / 2011</u>** – अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.2046-2052

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 567 नाग/2011**

श्री नरेन्द्र बळीराम भेलावे
रा. पो. गौतम नगर, बाजपाई वार्ड गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नगर परिषद कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री दिगांबर मेहर नगर रचनाकार
जन माहिती अधिकारी
नगर परिषद कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नगर परिषद गोंदिया मधील बाजपाई वार्ड गौतम नगर मधील ख.नं.267 चा प्लॉट सह लेआउट/नकाशाची नक्कल प्रत त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना लेआउट/नकाशाची प्रत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना नकाशाची प्रत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार श्री मेहेर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांच्या वतीने श्री पारधी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री मेहेर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 21.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे गौतम नगर मधील ख.नं.267 चा

प्लॉट सह लेआउट/नकाशाची नक्कल प्रत मिळण्यासाठी अर्ज केला होता. तथापी नगर परिषद गोंदिया यांनी सदर जागेतील कोणत्याही अभिन्यासास नगर परिषदने मंजुरी दिलेली नाही कारण ख.नं.267 गौतम नगर मधील बांधलेले घर हे अधिसूचीत झोपडपट्टी मध्ये येते म्हणून सदर जागेचा कोणताही अभिन्यास किंवा नकाशाला नगर परिषदने मंजुरी दिलेली नाही आणि ही वस्तुस्थिती दि. 14.10.201 च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविलेले आहे. तथापी नगर परिषद गोंदियाने गोंदिया शहराचा विकास आराखडा तयार केलेला आहे. त्या विकास आराखडयातील ख.नं.267 गौतम नगर या भागाच्या विकास आराखडयाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे. त्यावर अपीलकर्त्याने आयोगा पुढे सदरच्या भागाचा विकास आराखडयाची प्रत त्यांना उपलब्ध करुन देण्याची मागणी केली म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास गोंदिया शहराचा विकास आराखडा ख.नं.267 या भागाच्या विकास आराखडयाची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2054-2055

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 568 नाग/2011**

श्री किशोर शंकरराव धकाते
टाईप–III, क्वार्टर नं. 178, न्यु सी पी डब्लू डी कॉलनी
टी.व्ही.टावर, सेमीनरी हिल, नागपूर
ता. जि. नागपूर –06 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव(परीक्षा उपरांत व आचार्य पदवी कक्ष)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
परीक्षा भवन, एल.आय.टी.परिसर, अमरावती रोड, नागपूर 33
2) श्री नविन परशुराम मुंगले सहा. कुलसचिव
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(गोपनिय विभाग)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
परीक्षा भवन, एल.आय.टी.परिसर, अमरावती रोड, नागपूर 33 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 4.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन रोल नं.61742 हिवाळी 2010 परीक्षेतील प्रथम वर्ष B.E. या परीक्षेच्या Maths-II, E.M., Social Science, Chemistry & Physics या पेपरच्या झेरॉक्स प्रती मागितलेल्या होत्या. तथापि त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर श्री नविन मुंगळे सहा. कुलसचिव हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले.

4. जन माहिती अधिकारी तथा सहा. कुलसचिव श्री नविन मुंगळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 4.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही परीक्षेच्या संबंधातील असल्यामुळे आणि परीक्षा मंडळाच्या निर्णयानुसार निर्देश क्र. 5/2004 नुसार अपीलकर्त्याने मागितलेल्या पाचही वर्षाच्या उत्तरपत्रिका गोपनिय असल्यामुळे त्यांच्या छायांकीत प्रती उपलब्ध

करुन देता येत नाही असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले. तसेच यापूर्वी आयोगाने अपील क्र. 1304/2010 आदेश पारीत दि. 23.9.2010 मध्ये आयोगाने असा आदेश दिलेला आहे की अपीलकर्ता यांनी संबंधीत विद्यार्थ्यास सोबत घेवून उत्तरपत्रिकेचे निरीक्षण करुन घेता येईल असा निर्णय दिलेला आहे. ही बाब जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिली.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचेकडील अपील क्र. 1304/2010 आदेश पारीत दि. 23.9.2010 विचारात घेता अपीलकर्ता यांनी संबंधीत विद्यार्थ्यास सोबत घेवून उत्तरपत्रिकेचे निरीक्षण करुन घेणे हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) या नियमानुसार आहे म्हणून अपीलकर्त्याने संबंधीत विद्यार्थ्या सोबत उत्तरपत्रिकेचे निरीक्षण करुन घेणे योग्य व संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी कामकाजाच्या दिवशीची तारीख व वेळ लेखी कळवून त्या दिवशी संबंधीत विद्यार्थ्या सोबत अपीलकर्त्याने उपस्थित राहून सदरच्या उत्तरपत्रिकेचे निरीक्षण करावे.
2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यानंतर त्वरीत संबंधित उत्तरपत्रिका निरीक्षणासाठी त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2057-2058

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 565 नाग/2011**

श्री चंद्रकांत देवनाथ गोहणे
11/18 शेषशाही, आकार, बैरामजी टाऊन,
चिटणविसनगर ले–आऊट नागपूर
ता. जि. नागपूर –13 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती के. आर. कुंभलकर
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका
समर्थ रामदास हायस्कूल, अरोली
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.7.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 26.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 8.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका समर्थ रामदास हायस्कूल, अरोली ता. मौदा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली दि. 8.10.2010, दि. 15.10.2010, दि. 22.10.2010 आणि दि. 27.10.2010 रोजी अर्ज सादर करुन शाळे विषयी माहिती मागितलेली होती. सदरच्या अर्जामध्ये दि. 8.10.2010 चा अर्ज हा मुख्याध्यापिकेकडे पाठविला होता. दि. 15.10.2010, दि. 22.10.2010 चा अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सचिव यांचेकडे केलेला आहे आणि दि. 27.10.2010 चा अर्ज शाळा समिती अध्यक्ष यांचेकडे केलेला होता. तथापि त्यांना सचिव यांचेकडून माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविण्यात आले त्याप्रमाणे त्यांनी माहितीचे शुल्क भरणा केले. परंतू अपूर्ण माहिती त्यांना मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देवून माहिती मुख्याध्याकानी उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. तथापी त्यांना अद्यापही संपूर्ण माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ. कुंभलकर हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री पाटील हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका सौ. कुंभलकर यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे चार अर्जांपैकी एक अर्ज मुख्याध्यापिकेकडे प्राप्त झाला होता. दि. 15.10.2010, दि. 22.10.2010 चा अर्ज सचिव यांचेकडे प्राप्त झाला होता. आणि दि. 27.10.2010 चा अर्ज शाळा समिती अध्यक्ष यांचेकडे केलेला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास सचिव यांनी काही माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे सचिव यांनी त्यांना कळविल्यानुसार त्या आज आयोगा पुढे सुनावणीस उपस्थित झाल्या. अपीलकर्त्यास सचिवाकडून जी माहिती प्राप्त झालेली आहे त्याची पाहाणी केली असता अपीलकर्त्याने वर नमुद केलेल्या चार अर्जातील संपूर्ण माहिती त्यांना मिळालेली नाही. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहेत. म्हणून प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती संस्था सचिवाकडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याल्या चारही अर्जाची अपूर्ण राहिलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी जी माहिती मुख्याध्यापिकेशी संबंधीत आहे ती माहिती त्यांना त्वरीत द्यावी आणि जी माहिती संस्था सचिवाशी संबंधीत आहे त्याच्याकडून ती प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2060-2061

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 581 नाग/2011**

श्री राजा खान मेहबुब खान
द्वारा–डायमंड गॅस हाऊस, शॉप नं.5,
छोटी मस्जीद कॉम्प्लेक्स, सदर बाजार
नागपूर – 440 001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदास पेठ, नागपूर 440012
2) श्री व्ही. के. अलोने
जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपव्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदास पेठ, नागपूर 440012 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 9.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय उपव्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मे. मोहीत मिनरल्स् प्रा. लि. नवी दिल्ली या कोळसा हेंडलींग एजंट या कंत्राटदाराकडे वे.को.लि. परिसरात आणि एस. ई. सी. एल. परिसरात कोळसा हाताळणीच्या कार्यात कार्यरत असलेल्या कर्मचा–याच्या बाबतीत 1 ते 3 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 22.2.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीचे 2500 इतके पेजेस होवू शकतात म्हणून प्रती पेज रु. 2/– प्रमाणे रु. 5000/– माहितीचे शुल्क भरावे. तथापि अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे इतके पेजेस होत नाहीत म्हणून त्यांनी माहितीचे शुल्क भरले नाही. असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक श्री अलोने हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने ॲड. सुभेदार हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा उपव्यवस्थापक यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 9.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करुन माहितीचे अंदाजे पृष्ठ संख्या 2500 इतके पेजेस होवू शकतात म्हणून अधिनियमाच्या तरतुदीनुसार प्रती पेज रु. 2/— प्रमाणे माहितीचे शुल्क रु. 5000/— 7 दिवसात जमा करावे असे अपीलकर्त्यास पंजीबध्द डाकेने कळविले. तथापी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील विभागीय व्यवस्थापक यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असा निर्णय दिला की अपीलार्थी यांना माहिती अधिका—याने कळविलेल्या रकमेच्या सत्यतेबाबत शंका असल्याने निरीक्षण करण्यास वेळ देण्यास विनंती केली. म्हणून अपीलार्थीस कागदपत्रांचे निरीक्षण देवून माहितीचे शुल्क मागणी बाबत समाधान करणे संयुक्तिक ठरेल. म्हणून माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कागदपत्रांचे निरीक्षण करण्यास वेळ द्यावा व निरीक्षणा नंतर अपीलार्थी यांची खात्री पटवून द्यावे की कळविल्या प्रमाणे कागदपत्रांची संख्या भरत आहे व त्यानंतर रकमेचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला. त्यानंतर अपीलकर्ता यांनी माहितीचे निरीक्षण केले परंतू माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वकीलानी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 9.2. 2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.2.2011 च्या पत्राने माहितीचे शुल्क रु. 5000/— भरण्याबाबत कळविलेले आहे. मात्र एवढया मोठया प्रमाणात माहितीचे शुल्क मागण्याबाबत अपीलकर्त्यास शंका आहे. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद केल्यानुसार अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून त्यांना पाहिजे असलेल्या माहितीचे निरीक्षण करुन घेवून त्यातील नेमकी त्यांना जी माहिती पाहिजे आहे त्याचे शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी माहितीचे निरीक्षण करुन घेण्यासाठी बोलवावे आणि ते आल्यानंतर त्यांनी मागितलेल्या माहितीचे दस्तऐवज निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे आणि निरीक्षणाअंती अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीचे शुल्क भरुन घेवून त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2063-2065

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 579 नाग/2011**

श्री गणपती विठोबा धोबे
साईनगर वणी नाका वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री के. अे. कदम नायब तहसिलदार
जन माहिती अधिकारी
उपविभागीय अधिकारी कार्यालय वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय वरोरा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन तहसिलदार श्री माने यांनी रा.मा.क्र. 24/आरटीएस–64/2009–2010 मध्ये दि. 18.8.2010 ला आदेश पारीत केलेला आहे. त्या संदर्भात उदय गृह निर्माण सोसायटीत एकुण 30 सदस्य आहेत त्यांचे तहसिलदार श्री माने यांनी चौकशी करुन बयाण घेवून हा निकाल दिला असावा म्हणून त्याबद्यल 30 सभासदांच्या बयाणाच्या प्रमाणित नकला त्यांनी मागितलेल्या होत्या. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी,
वरोरा यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी नायब तहसिलदार श्री कदम हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.11.2010 चा माहितीचा अर्ज उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात स्पष्ट बोध होत नसल्याने खुलासा करण्यासाठी अपीलकर्त्यास दि. 1.12.2010 रोजी पत्र पाठवून त्यांच्या कार्यालयात दि. 6.12. 2010 रोजी उपस्थित राहण्यास कळविले. त्यानुंसार अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाले. आणि अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील संपूर्ण धारीका त्यामधील 1 ते 157 पाने अपीलकर्त्यास दाखविण्यात आली. अपीलकर्त्याने त्या धारीकेचे निरीक्षण केले मात्र निरीक्षणा नंतर त्यातील कोणतेही कागदपत्रे त्यांना नको म्हणून

त्यांनी सांगितले. त्याप्रमाणे रोजनाम्यावर अपीलकर्त्याने सही केली असे श्री कदम जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण धारीका अपीलकर्त्यास दि. 6.12.2010 रोजी निरीक्षणासाठी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी त्यातील कोणत्याही कागदपत्रांची मागणी अपीलकर्त्याने त्यावेळी जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेली नाही असे दिसते. तथापी त्यांनी आज आयोगा समोर सुनावणीत असे नमुद केले की तहसिलदार यांच्याकडील दि. 18.8.2010 चा पारीत केलेल्याा आदेशात श्री बापूराव विष्णूजी पोटे यांनी लेखी बयाण दिल्याचे नमुद केलेले आहे त्याची प्रत त्यांना उपलब्ध करुन द्यावी. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास या बयाणाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास तहसिलदार यांच्या दि. 18.8.2010 च्या पारीत केलेल्याा आदेशात ज्या बयाणांचा उल्लेख केलेला आहे त्याच्या प्रती अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावे. आणि त्याव्यतिरीक्त इतर सभासदांचे बयाण घेण्यात आलेले नाही असे देखील जन माहिती अधिकारी यांनी कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2064-2065

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 580 नाग/2011**

श्री महादेव यादव मेश्राम
गोसे(खुर्द)
ता. पवनी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री यशवंत गेडाम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा
ता. जि भंडारा
2) श्री विनोद हरकंडे
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. रामटेके हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. रामटेके हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मा. अतिरिक्त आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांनी दि. 31.1.1990 रोजी केस क्र. आर पी नं. 50/89–90 मध्ये पारीत केलेल्या आदेशान्वये पुढील कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आपण मागितलेली माहिती ही 20 वर्षापूर्वीचे असून प्रकरणाचा शोध घेतला असता प्रकरण या कार्यालयात आढळून आले नाही त्यामुळे आपणास माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांना जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भंडारा यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भंडारा श्री विनोद हरकंडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी भंडारा श्री यशवंत गेडाम हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भंडारा श्री विनोद हरकंडे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतू अर्जात अपीलकर्त्याने मा. अतिरिक्त आयुक्त नागपूर विभाग नागपूर यांनी दि. 31.1.1990 रोजी आणि दि. 14.2.2009 रोजी पारीत केलेला आदेश केस क्र. आर पी नं. 50/89–90 अन्वये केलेल्या पुढील कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही 20 वर्षापूर्वीची असल्यामुळे त्या संबंधीत प्रकरणाचा त्यांच्या कार्यालयात शोध घेण्यात आला. तथापी सदरचे जुने प्रकरण त्यांच्या कार्यालयात आढळून आले नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य नाही असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भंडारा यांनी कळविल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी भंडारा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय असा देण्यात आला की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही एक महिन्याचे आत पुरवावी. त्याला अनुसरुन पुन्हा अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. तथापी सदरचे प्रकरण उपलब्ध झाले नाही. म्हणून पुन्हा दि. 7.4.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की सदर प्रकरण 20 वर्षापूर्वीचे असून प्रकरणाचा शोध घेतला असता प्रकरण या कार्यालयात आढळून आले नाही त्यामुळे माहिती उपलब्ध होवू शकत नाही असे अपीलकर्त्यास पुन्हा जन माहिती अधिकारीयांनी कळविल्याचे श्री विनोद हरकंडे उपविभागीय अधिकारी भंडारा यांनी आयोगा पुढे सांगितले.

6. अपीलकर्ता यांचे वकील तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही 20 वर्षापूर्वीच्या प्रकरणाच्या संदर्भात आहे. त्या प्रकरणाचा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात शोध घेण्यात आला. परंतू संबंधीत प्रकरण आढळून आले नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2067-2068

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 587 नाग/2011**

श्री जयवंत मधुकर मिश्रा
प्लॉट नं. 16, जवाहर कॉलनी
मु. पो. पुलगांव
ता. देवळी जि. वर्धा – 442302 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री डी. वाय. तेलंग उपशिक्षणाधिकारी
जन माहिती अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 8.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण प्राधिकृत प्रकाशन शुक्रवार 18 नोव्हेंबर 2005 अन्वये महाराष्ट्र शासनाने केंद्रीय माहितीच्या अधिकारान्वये तयार केलेल्या नियमाप्रमाणे फ्लॉपीच्या स्वरुपात मागणी केलेल्या माहितीचे शुल्क फ्लॉपी करीता रु. 50/– आकारावे असे आहे. मात्र त्यांचेकडून फ्लॉपीचे शुल्क रु. 250/– घेण्यात आले म्हणून त्या नियमाची माहिती त्यांनी मागितलेली होती. आणि त्यांचे जादा घेतलेले शुल्क परत करावे अशी त्यांची मागणी होती. तथापी त्यांना रु. 50/– पेक्षा जादा आकारलेले शुल्क अद्याप परत मिळालेले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना जादा घेतलेल्या शुल्काची माहिती मिळाली नाही किंवा जादा घेतलेले शुल्क त्यांना परत मिळाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. आणि फ्लॉपीचे जादा आकारलेले शुल्क त्यांना परत करावे असे त्यांनी आयोगा समोर सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी श्री डी. वाय. तेलंग हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांनाच प्राधिकृत केलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी श्री डी. वाय. तेलंग यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने सी.डी.च्या स्वरुपात माहिती त्यांनी मागितलेली होती. ती सी.डी. बाहेरुन तयार करण्यात आली त्या सी.डी.चा खर्च रु. 200/– आला आणि पोस्टेज

चार्जेस रु. 30/– असे एकुण रु. 250/– माहितीचे शुल्क आकारण्यात आले. तथापी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 4 (2) (a) नुसार फ्लॉपीचे शुल्क रु. 50/– निश्चित घेण्यात आलेले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी फ्लॉपीचे शुल्क रु. 50/– आणि पोस्टेज चार्जेस इत्यादीचे शुल्क अपीलकर्त्यास आकारणे आवश्यक होते. परंतू जन माहिती अधिकारी यांनी आकारलेले माहितीचे शुल्क हे जादा असल्याचे दिसून आले त्यामुळे अपीलकर्त्यास जादा घेतलेले शुल्क परत करणे करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून त्वरीत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास फ्लॉपीचे शुल्क रु. 50/– आणि पोस्टेज चार्जेस घेवून बाकीचे जादा घेतलेले शुल्क त्वरीत परत करावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2070-2071

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 588 नाग/2011**

श्री जयवंत मधुकर मिश्रा
प्लॉट नं. 16, जवाहर कॉलनी
मु. पो. पुलगांव
ता. देवळी जि. वर्धा – 442302 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री डी. वाय. तेलंग उपशिक्षणाधिकारी
जन माहिती अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 8.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. या माहिती मध्ये त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दिलेल्या माहिती अधिकाराखालील अर्जाची माहिती त्यांनी मागितलेली होती. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. आणि संबंधीता विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी श्री डी. वाय. तेलंग हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांनाच प्राधिकृत केलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी श्री डी. वाय. तेलंग यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 8.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी त्यांच्याकडे उपशिक्षणाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार असल्यामुळे कामाचा व्याप जास्त आहे. त्यामुळे अतिरिक्त कार्यबाहुल्यामुळे अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत त्यांच्याकडून कोणतीही माहिती अपीलकर्त्यास देण्यात आलेली नाही. तथापी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दि. 8.10.2010 च्या अर्जात नमुद केलेल्या चारही मुद्यांची माहिती 15 दिवसात अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात येईल असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

5. तसेच अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही असेही जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि.8.10.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. तसेच अद्यापपर्यंत देखील माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे. या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असा खुलासा केला आहे की कार्यबाहुल्यामुळे ते अपीलकर्त्यास माहिती देवू शकले नाही. तथापी जन माहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 8.10.2010 च्या माहिती अर्जातील 1 ते 4 मुद्यांची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 8.10.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अद्यापपर्यंत देखील माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला आहे. म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 10000/– ची शास्ती लादण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करावी.

3) सदरच्या शास्तीची वसुलीची कार्यवाही **शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद वर्धा** यांनी करावयाची आहे.

4) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.2073-2075

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 589 नाग/2011**

श्री जयवंत मधुकर मिश्रा
प्लॉट नं. 16, जवाहर कॉलनी
मु. पो. पुलगांव
ता. देवळी जि. वर्धा – 442302 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.1 नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. मात्र उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.7.2011 रोजी लेखी निवेदन सादर केलेले असून त्यांना पाहिजे असलेल्या कागदपत्रांचे निरीक्षण त्यांना मिळालेले आहे. म्हणून आयोगाकडील द्वितीय अपील मागे घेत असल्याचे त्यांनी नमुद केले. त्यामुळे अपील खारीज करावे अशी विनंती त्यांनी पुन्हा आज सुनावणीच्या वेळी केली. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2077-2078

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे तक्रार क्रमांक 644 नाग/2011**

श्री कमलाकर केशव आस्कर
34, शिवसाधना, पश्चिम समर्थ नगर
वर्धा रोड नागपूर – 440015 ..... **तक्रारदार**

**विरुध्द**

1) डॉ. ए. के. लवंगे
जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय
सोमवारी पेठ ता. जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 30.7.2011 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 16.5.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 18 अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. तक्रारदार व गैरतक्रारदार यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 13.7.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.7.2011 रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस तक्रारदार व गैरतक्रारदार जन माहिती अधिकारी श्री लवंगे हे हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस तक्रारदार यांनी आयोगापुढे असे सांगितले की दि. 16.5. 2011 रोजी आयोगाकडील त्यांच्या अपील क्र. 1739/2010 मधील दि. 16.3.2011 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे त्यांना पाहिजे असलेल्या जन्म नोंदीचा फॉर्म नं.1 ची प्रत त्यांना मिळाली नाही. म्हणून त्यांनी तक्रार दाखल केलेली आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांचेकडे तक्रारदार यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केले तरी त्यांना जन्म नोंदीचा फॉर्म नं.1 ची प्रत मिळाली नाही असे त्यांनी आयोगा पुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिक्षक डॉ. ए. के. लवंगे यांनी आयोगापुढे असे सांगितले की आयोगाकडील त्यांच्या अपील क्र. 1739/2010 मधील दि. 16.3.2011 च्या निर्णयातील आदेशाप्रमाणे तक्रारदार यांनी त्यांचेकडे जे प्रतिज्ञापत्र दाखल करावयाचे आहे ते प्रतिज्ञापत्र सौ. शोभा रमेश बरडे यांनी दाखल करावयाचे आहे. कारण सौ. शोभा रमेश बरडे यांच्या मुलीच्या जन्म नोंदी तक्रारदारास पाहिजे आहे म्हणून तक्रारदारा ऐवजी त्यांची बहीण सौ. शोभा रमेश बरडे यांचे त्यांना प्रतिज्ञापत्र पाहिजे आहे. तसेच लग्नानंतर अपीलकर्त्याच्या बहीणीच्या नावात बदल झाले असल्यास त्याचा देखील उल्लेख प्रतिज्ञापत्रात असणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्त्याने त्यांच्या ऐवजी त्यांच्या बहीणीच्या मुलीच्या जन्माची नोंद त्यांना पाहिजे

असल्यामुळे अपीलकर्त्याने त्यांच्या बहीणीचे प्रतिज्ञापत्र तसेच नाव बदलले असल्यास त्याबाबतचा उल्लेख करुन कागदपत्र दाखल केल्यास अपीलकर्त्यास त्यांच्या बहीणीच्या मुलीचा जन्म नोंदीची फॉर्म नं.1 त्वरीत उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. म्हणून तक्रारदाराची तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजुर करण्यात येत असून तक्रारदार यांनी त्यांची बहीण सौ. शोभा रमेश बरडे यांचे प्रतिज्ञापत्र जन माहिती अधिकारी यांचेकडे दाखल करावे तसेच सदरच्या प्रतिज्ञापत्रात लग्नानंतर सौ. शोभा रमेश बरडे यांच्या नावात बदल झाला असल्यास त्या बदलाचाही उल्लेख सदरच्या प्रतिज्ञापत्रात करावा म्हणून जन्म नोंदीच्या फॉर्म नं.1 च्या संदर्भात वर नमुद केलेले कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांचेकडे दाखल करावा ही कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना जन्म नोंदीचा फॉर्म नं.1 ची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2075-2076

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 594 नाग/2011**

श्री पॅथर प्रकाश बन्सोड
180 उंटखाना, मेडिकल कॉलेज रोड, नागपूर
ता. जि. नागपूर – 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डि. एस. शेळके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग, वैनगंगानगर, अजनी, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री नि. लो. तेलंग उपविभागीय अधिकारी
पाटबंधारे विभाग हिंगणघाट
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
निम्म वणा कालवे, उपविभाग क्र.6, हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 16.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता निम्म वणा कालवे, उपविभाग क्र.6, हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री रमेश डोमाजी म्हैसकर रा. सेडेश्वर येथील सर्व्हे नं. 148 आणि मौजा पिपरी येथील सर्व्हे नं.401 ही जमीन वना प्रकल्पाखाली संपादन केलेली आहे त्याबाबत 1 ते 7 मुद्यांवर त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 24.12.2010 च्या पत्राने आणि दि. 31.1.2011 च्या पत्राने त्यांना माहिती प्राप्त झाली. मात्र आपेक्षेप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. मात्र कार्यकारी अभियंता यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पाटबंधारे विभाग हिंगणघाट श्री तेलंग हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री डी. एस. शेळके हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री तेलंग यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 16.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 20.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती दि. 24.12.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. त्यानंतर पुन्हा अपीलकर्त्यास दि. 31.1.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली दि. 24. 12.2010 च्या पत्राची माहिती आणि दि. 31.1.2011 च्या पत्राची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की जन माहिती अधिकारी

यांनी ज्या मुद्यां बाबत त्यांच्या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे त्या मुद्यांची माहिती कोणत्या कार्यालयाकडे मिळू शकेल त्यांची माहिती त्यांना पाहिजे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की सदरच्या जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही ही विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडून झालेली आहे त्यामुळे अपीलकर्त्यास काही माहिती विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे मिळण्याची शक्यता आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी ज्या मुद्यां बाबत त्यांच्या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे त्या मुद्यांची माहिती कोणत्या कार्यालयाकडे उपलब्ध होण्याची शक्यता आहे त्याची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

5. तसेच प्रस्तूत प्रकरणात प्रथम अपील कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, वैनगंगानगर, अजनी, नागपूर यांचेकडे दाखल केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वतः प्रथम अपीलाची सुनावणी घेवून प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसत नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील ज्या मुद्यांची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही त्या मुद्यांची माहिती दुस–या कोणत्या कार्यालयाकडे उपलब्ध होण्याची शक्यता आहे त्याची माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावी.
2) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वतः प्रथम अपीलाची सुनावणी घेवून प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2078-2079

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 597 नाग/2011**

श्री शैलेश पुंडलीकराव डोंगरवार
रा. हनुमान वार्ड वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुमेध अलोणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री प्रकाश ता. कोटेचा सहा. कर निरीक्षक
जन माहिती अधिकारी
प्रशासन विभाग नगर परिषद वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.7.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.4.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 17.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.7.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. कर निरीक्षक श्री प्रकाश कोटेचा नगर परिषद वरोरा हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद वरोरा श्री सुमेध अलोणे हे उपस्थित होते.

2. जन माहिती अधिकारी श्री कोटेचा यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 30.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 30.11.2010 रोजी प्राप्त झाला. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने नगर परिषद कार्यालयात वरीष्ठ लिपीक या पदावर कार्यरत असलेले श्री कोटेचा यांच्या नियुक्तीच्या आदेशाची प्रत आणि श्री कोटेचा यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत मागून व पुढून त्याची छायांकित प्रत मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 23.12.2010 च्या पत्राने श्री कोटेचा यांच्या नियुक्तीच्या आदेशाची प्रत आणि श्री कोटेचा यांच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत उपलब्ध करुन दिली आणि नगर परिषद येथे आकृतीबंधानुसार वरीष्ठ लिपीकाची सहा पदे मंजूर असून सद्यस्थितीत वरीष्ठ लिपीकाची सहा पदे रीक्त आहेत अशी देखील माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

3. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात श्री कोटेचा हे वरीष्ठ लिपीक असल्याबाबत नमुद केलेले आहे. मात्र श्री कोटेचा हे वरीष्ठ लिपीक नसून सन 2008 पासून नगर परिषद संचालनालय मुंबई यांनी महाराष्ट्र राज्य नगर परिषद कर्मचारी संवर्गात समावेशनाचा आदेश काढलेला आहे त्या आदेशामध्ये

श्री कोटेचा यांची नियुक्ती नागपूर विभागात अ.क्र.149 वर दर्शवून कर निर्धारक व प्रशासकीय सेवा (श्रेणी क–2) नगर परिषद वरोरा जि. चंद्रपूर वर नियुक्ती करुन समावेशन केलेले आहे त्याची प्रत देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

4. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील मुख्याधिकारी नगर परिषद वरोरा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले तथापी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद करुन अपीलकर्त्यास आणखी काही माहिती पाहिजे असज्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिला. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास त्यांच्या दि. 30.11.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 23.12.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.2081-2082

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**